सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ११ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजित पवारांनी ११ व्यांदा सादर केला अर्थसंकल्प

मुंबई : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ११ व्यांदा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी २०२५ - २६ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. राज्याची २०२५ - २६ या आर्थिक वर्षासाठीची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये असल्याचे अर्थमंत्री म्हणाले.

ठळक वैशिष्ट्ये

१. राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

२. आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलीयन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरीडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.

३. विकसित भारत-विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरीता मेक इन महाराष्ट्र व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगीक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपायांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.

४. कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक ३.३% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिंचन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.

५. केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाअधिक केंद्रीय निधी



प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.

६. वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.

७. महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरीता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

८. राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.

९. दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.

१०. सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

११. नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

१२. राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

१३. थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.

१४. राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.

१५. राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

१६. क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१७. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.

१८. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

१९. राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

२०. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्या करीता शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे.

२१. कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

# योगी सरकार १० ते २५ हजार रुपयांचे स्टॅम्प पेपर्स बंद करणार

## १९ प्रमुख प्रस्तावांनाही दिली मान्यता

लखनऊ : योगी सरकारने सोमवारी एका महत्त्वाच्या निर्णयात १०,००० ते २५,००० रुपयांचे भौतिक स्टॅम्प पेपर टप्प्याटप्प्याने रद्द करून त्याऐवजी ई-स्टॅम्पिंगला मंजुरी दिली. यामुळे पारदर्शकता वाढेल आणि अनियमितता रोखता येईल. या निर्णयानुसार, ५,६३० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे स्टॅम्प लिलाव केले जातील, जुने स्टॅम्प फक्त ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध असतील.

लोकभवन येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत योगी सरकारने १९ महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. बैठकीनंतर अर्थमंत्री सुरेश खन्ना यांनी जाहीर केले की सर्व प्रस्तावांवर चर्चा झाली आणि त्यांना एकमताने मंजुरी देण्यात आली.

या प्रस्तावांमध्ये आरोग्य, शिक्षण, वाहतूक, शहरी विकास आणि कर्मचारी कल्याण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी हे निर्णय घेतले गेले आहेत. या निर्णयांमुळे राज्यातील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.

इतर प्रमुख निर्णय:

बलिया येथे स्वातंत्र्यसैनिक चित्तू पांडे यांच्या नावाने वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी १४.०५ एकर जमीन हस्तांतरित. आग्रा मेट्रो रेल प्रकल्पाच्या पहिल्या आणि दुसऱ्या कॉरिडॉरसाठी जमीन वाटप. केंद्र सरकारच्या २,४२५ रुपये प्रति क्विंटल गहू आधारभूत किमतीसह ६,५०० खरेदी केंद्रे उभारण्याचा निर्णय. बुलंदशहरमध्ये नर्सिंग कॉलेजसाठी ४,५७० चौरस मीटर जमीन वैद्यकीय शिक्षण विभागाला हस्तांतरित. सैफई (इटावा) येथील उत्तर प्रदेश वैद्यकीय विद्यापीठात ३०० खाटांच्या प्रसूती व बालरोग विभागासाठी २३२.१७ कोटी रुपयांची मंजुरी.

राज्य स्मार्ट सिटी योजनेला आणखी दोन वर्षांची मुदतवाढ, ज्यामध्ये उत्तर प्रदेशातील १७ महानगरपालिका समाविष्ट. कानपूरमधील बंद स्पिनिंग मिल्सच्या ४५१.२० एकर जमिनीचे औद्योगिक वापरासाठी यूपीएसआयडीएला हस्तांतरण. लखनऊच्या संरक्षण औद्योगिक कॉरिडॉरमध्ये संरक्षण चाचणी पायाभूत सुविधा स्थापन करण्यासाठी ०.८ हेक्टर जमीन हस्तांतरित.

हरदोईतील महर्षी दधीची कुंडाच्या पुनरुज्जीवनासाठी ०.८५० हेक्टर जमीन पर्यटन विभागाला हस्तांतरित.

विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषदेच्या २५ वर्षे सेवा दिलेल्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचे फायदे.

# हे तर चॅम्पियन बजेट - एकनाथ शिंदे

मुंबई : गेल्या अडीच वर्षांपासून सुरू असलेल्या लोकाभिमुख योजना आणि पायाभूत सुविधा यांचा योग्य तो संतुलन राखणार हे चॅम्पियन बजेट उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी मांडले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजच्या अर्थसंकल्पाविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

गेल्या अडीच वर्षांपासून विकासाची घोडदौड सुरू असून महाराष्ट्र आता थांबणार नाही हा निर्धार आजच्या अर्थसंकल्पातून व्यक्त होतो असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, दिवंगत शेषराव वानखेडेंनंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळेस देखील हा अर्थसंकल्प मांडतांना समतोल राखत सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकेसारख्या प्रगत देशाचा विकास हा रस्त्यांमुळे झाला आहे. आजच्या अर्थसंकल्पात रस्ते, पूल, बंदरे अशा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी चांगली तरतूद केली आहे असे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, आजच्या अर्थसंकल्पात एकही क्षेत्र सोडलेले नाही. औद्योगिक विकासात महाराष्ट्र आघाडीवर असून तो आणखीही पुढे राहील त्याचप्रमाणे गुंतवणुकी मोठ्या प्रमाणावर येईल अशा तऱ्हेने या अर्थसंकल्पामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत.

मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्राची क्षमता दीड ट्रिलियन डॉलर्स योगदानाची आहे. समृद्धी, अटलसेतू सारखे गेम चेंजर प्रकल्प गेल्या अडीच वर्षांत पूर्ण झाले आहेत.

शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना आणखी लाभ होईल. अडीच वर्षांपासून आपण सिंचनाच्या प्रकल्पांना वेग दिला असून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी उचललेली पावलं अतिशय महत्त्वाची आहेत. गरीब, दुर्बल महिलांना केवळ लाडकी बहीण योजनेतून पैसे देऊन आम्ही थांबलेलो नाहीत तर त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी या बजेटमध्ये आम्ही तरतूद केलेली आहे. लाडकी बहीण योजना बंद करण्यात येणार असा अपप्रचार विरोधकांनी सुरू केला होता मात्र आम्ही या योजनेसाठी बजेटमध्ये ३६ हजार कोटींची तरतूद करून बहिणींना मदत करण्याचा आमचा निर्धार कायम ठेवला आहे असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# विकसित महाराष्ट्र साकारणारा, लोकाभिमुख अर्थसंकल्प

## शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार, सामाजिक विकासाची पंचसूत्री

मुंबई : विकसित भारतासोबतच, विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणारा, लोकाभिमुख असा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, पायाभूत सुविधांबरोबरच रोजगार आणि सामाजिक विकास अशी पंचसूत्री आहे. संतुलित अशा या अर्थसंकल्पाला अनुसरून आमची पुढील वाटचाल, असेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी विधान सभेत सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. पत्रकार परिषदेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.

महाराष्ट्राचा विकासदर सर्वाधिक

राज्याचा हा अर्थसंकल्प संतुलित स्वरुपाचा आहे. यात राजकोषीय तूट २.७ टक्क्यांपर्यंत राखण्यात यश आले आहे. सरत्या वर्षात ही तूट २.९ टक्क्यांपर्यंत होती. महसूली जमा आणि खर्च यांचा उत्तम ताळमेळ राखला गेला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पाचे आकारमान आता सात लाख कोटींवर पोहचले आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे आता लोकसंख्येच्य तुलनेत उत्तर प्रदेशचा अपवाद केल्यास, सर्वात मोठा अर्थसंकल्प असणारे राज्य ठरले आहे. महाराष्ट्राची जीएसडीपी (सकल राज्य घरेलू उत्पादन) वाढ चांगली आहे. गेल्या दहा वर्षात हे प्रमाण ७.५ टक्क्यांवर पोहचले आहे. हे उत्पादन पाच ते दहा लाख कोटींनी वाढले आहे. त्यामुळे या प्रमाणात आपली कर्ज घेण्याची मर्यादाही वाढली आहे. त्यामुळे आपण विहीत कर्ज मर्यादेचे उल्लंघन केलेले नाही, हे देखील उल्लेखनीय आहे.

उद्योग क्षेत्राची भरारी

आपल्या उद्योग क्षेत्रानेही भरारी घेतली आहे. कोविड काळाचा अपवाद वगळल्यास हा वाढीचा दर चांगला आहे. आपले राज्य स्टार्टअपमध्ये क्रमांक एकवर आहे. जीसएसटी कर संकलनातही महाराष्ट्र पुढे आहे. राष्ट्रीय कर संकलनाच्या तुलनेत आपण सात टक्क्यांहून अधिक म्हणजे दिड लाख कोटींच्या पुढे आहोत. इतर राज्ये आपल्या मागे आहेत. औद्योगिक वाढ, विदेशी गुंतवणूक आणि स्टार्टअप



आणि जीएसटीमुळे महाराष्ट्र यापुढेही अग्रेसर राहील, हा विश्वास आहे.

पायाभूत सुविधांचे प्रभावी नियोजन

राज्यातील पायाभूत सुविधांमध्ये रस्ते विकास हा महत्त्वाचा विषय आहे. आपल्या अर्थसंकल्पात रस्त्यांचा विकास हा पुढील वीस वर्षांचा विचार करून, नियोजनबद्धरित्या करण्यावर भर दिला गेला आहे. यामुळे रस्त्यांचा आराखडा गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत एक समान पद्धतीने होणार आहे. या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी आपण बाह्य यंत्रणेच्या माध्यमातून निधी उभारण्यावर भर देण्यात येणार आहे. वर्ल्ड बँक, एशियन बँक, न्यु डेव्हलपमेंट बँक आणि नाबार्डच्या माध्यमातून रस्त्यांचे जाळे उभरले जात आहे. यामुळे आपल्या राज्यात बंदरे, विमानतळांच्या विकासासाठीही मोठी गुंतवणूक येणार आहे.

घर बांधणीत महाराष्ट्रच अग्रेसर..

महाराष्ट्राने घर बांधणीच्या क्षेत्रात मोठी मजल गाठली आहे. या क्षेत्रातही मोठी गुंतवणूक आली आहे. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजनेतून आपण आता वीस लाख घरांचा टप्पा गाठत आहोत. यातही केंद्र आणि राज्य यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधीचा ओघ राहणार आहे. यातील घरांना प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून वीजेसाठी स्वयंपूर्ण केले जाणार आहे. याशिवाय ज्या घरांचा वीज वापर तीनशे युनीटहून कमी असेल, त्यांनाही या योजनेतून वीज देण्याचे सुतोवाच आजच्या अर्थसंकल्पात केली गेली आहे.

शेती, सिंचन क्षेत्रालाही प्राधान्य

या अर्थसंकल्पात कृत्रिम बृद्धिमता- एआय आणि बायोटेक, ड्रोन टेक्नॉलॉजी सारख्या उत्पादन खर्च कमी करणाऱ्या आणि शेतीतील नफा वाढवणाऱ्या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. एआयद्वारे माती परिक्षण ते फुल-फलधारणा यापर्यंतच्या टप्प्यांचे नियोजन करता येणारे शक्य आहे. त्याबाबतचे नियोजनही केले गेले आहे. जलयुक्त शिवार टप्पा दोन आणि नदिजोड प्रकल्पासाठी भरीव तरतूद केली गेली आहे.

लाडक्या बहिणी ते लखपती दिदी

लाडक्या बहिणींसाठी निधी कमी पडणार नाही, असे नियोजन केले गेले आहे. याशिवाय या योजनेतून बहिणी आर्थिक स्वावलंबी व्हावेत असे नियोजन आहे. काही बहिणींनी या पंधराशे रुपयांतून सोसायटी स्थापन केल्या. या सोसायट्यांचे जाळे निर्माण करून, राज्यस्तरीय अपेक्स अशी सोसायटी स्थापन केली जाईल. याशिवाय आपल्याला लखपती दीदी या महिलांच्या स्वयंरोजगाराच्या संकल्पनेलाही पुढे न्यायचे आहे. आतापर्यंत आपण २३ लाख लखपती दीदींचे उद्दीष्ट पूर्ण केले आहे. आणखी २४ लाखांचे उद्दीष्ट्य साध्य करून एक कोटी लखपती दीदींचे लक्ष्य गाठायचे आहे.

सामाजिक न्याय, आदिवासींचाही विकास

सामाजिक न्याय, आदिवासी विभागांच्या तरतुदीत भरीव वाढ करण्यात आली असून ती प्रत्येकी ४३ व ४० टक्के एवढी आहे. सामाजिक न्यायाच्या धोरणाला बळ मिळेल. यात वैयक्तीक लाभाच्या योजना राबवल्या जाणार असल्यामुळे अनेक कुटुंबांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यासंदर्भातील लाभ निश्चितच होतील. विकासाकडे जाताना रोजगार संधीवर भर देणारा अर्थसंकल्प आहे. यापुर्वी अर्थमंत्री म्हणून १३ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम दिवंगत शेषराव वानखेडे यांच्या नावावर होता. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री पवार यांनी अकराव्यांदा अर्थसंकल्प सादर केला आहे. यापुढील वाटचालीत ते देखील हा विक्रम पूर्ण करून, अर्थसंकल्प सादर करतील, असा विश्वास आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद करून उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री पवार आणि वित्त राज्यमंत्री जयस्वाल यांचे अभिनंदन केले.

# शेकटा येथील दोन शाळकरी मुलांचा शेततळ्यात बुडून मृत्यू एकाला वाचवले

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १० मार्च पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील शेकटा गट न. ४७ येथील शेतात मदन सिताराम गवांदे यांच्या शेततळ्यात दुपारी साडे तीन वाजेच्या सुमारास प्रणव दिपक दाभाडे (वय १२), आरूष दत्तात्रय दाभाडे (वय १०) व आकाश अशोक गवांदे (वय १३) हे तीन लहान मुले पोहण्यासाठी उतरले असता त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात गेल्याने बुडायला लागल्यावर तिघे आरडाओरडा करायला लागले. जवळच आसपास शेतात काम करणाऱ्या महिलांनी आवाज ऐकून धावत आल्या त्यांनी त्यांच्या अंगावरील साडीने वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु तिघांपैकी फक्त आकाश अशोक गवांदे याचाच जीव वाचविण्यात यश मिळाले प्रणव व आरुष हे दोघे बुडून खाली



पाण्यात तळाला गेल्याने त्यांना अग्नीशामक दलाच्या जवानांनी व काही मासे पकडणाऱ्यांनी पाण्याच्या बाहेर काढले. दोघांना सायंकाळी सात वाजेच्या सुमारस ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता दोघांना तपासून डॉक्टरांनी मृत घोषित केले. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अशोक माने, संदीप नाडे करीत आहे.

# ऊसाने भरलेला ट्रक उलटून सहा ऊसतोड मजूर ठार!



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० मार्च - कन्नड सिल्लोड राज्यमार्गावर कन्नड पासून अवघ्या सहा किमी वर ऊसाने भरलेला ट्रक उलटून भीषण अपघातात सहा ऊसतोड मजुरांना आपला जीव गमवावा लागल्याची घटना रविवार रोजी मध्यरात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास घडली आहे

कोळसवाडी खांडी चंदन नाल्याच्या पुढे रविवारी मध्यरात्री ११: ३० वाजेच्या दरम्यान ट्रक क्रं. जी.जे.१० टि.व्ही.८३८६ निंभोरा वरून रसवंतीसाठी ऊस घेऊन गुजरात कडे निघाला होता. ट्रकमध्ये ऊस जास्त भरलेला होता. त्यात वेग जास्त असल्याने ट्रक कोळसवाडी खांडी येथे येताच अनियंत्रित होऊन रोड खाली उलटला. यात ट्रकच्या टपावर आणि केबिनमध्ये बसलेले ऊसतोड मजूर उसाच्या खाली दबले गेले. यात चार जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जणांचा जिल्हा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला तर अन्य नऊ गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच कन्नड शहर पोलिसासह सामाजिक कार्यकर्ते राहुल वाघ व मित्र घटनास्थळी दाखल झाले, ऊसा खाली दबलेल्या मजुरांना काढण्यात





आले पण दुर्दैवाने चार मजुरांना वाचवण्यात अपयश आले,जखमींना तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले प्राथमिक उपचार करून जखमींना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले पण वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली या अपघातात किसन धर्म राठोड (वय ३२), कृष्णा मूलचंद राठोड (वय ३०),मिथुन मारू चव्हाण (वय२६), मनोज नामदेव चव्हाण (वय २३),विनोद नामदेव चव्हाण (वय २६) सर्व रा. सातकुंड ता. कन्नड तर

ज्ञानेश्वर देविदास चव्हाण (वय ३०) रा. बेलखेड तांडा यांची प्राणज्योत मालवली तर जखमी इंद्रचंद प्रेमचंद चव्हाण (वय ३१),लखन छगन राठोड (वय२९),सचिन भागिनाथ राठोड (वय २२),राहुल नामदेव चव्हाण (वय १९),रवींद्र नामदेव राठोड (वय २५),सागर भागिनाथ राठोड (वय २५),राणीबाई लखन राठोड (वय ३०) सर्व राहणार सातकुंड तर इस्माईल अब्दुल जेडा (वाहन चालक) उमर मुसा जेडा (क्लीनर) सर्व रा. गुजरात जखमी मजुरांवर चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगर, कन्नड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.सातकुंड तांडा येथे शोकाकुल वातावरणात पाच मजुरांवर अंत्यसंस्कार करण्यात आले तर एका मजुरावर बेलखेडा तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आमदार अर्जुन खोतकर यांचे पाठबळ व सामाजिक पाठपुराव्यामुळे जालना शहरात महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारला गेला - ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील सकल राजपूत समाजाच्या पाठपुराव्यामुळे व आमदार अर्जुन खोतकर यांचे पाठबळामुळे महाराणा प्रताप यांचा अश्वारूढ पुतळा उभारला गेला असल्याचे राजपूत समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष खुशालसिंह ठाकूर यांनी म्हटले आहे.

याबाबत पत्रकारांशी बोलतांना ठाकूर म्हणाले की, जालना शहरात हिंदूसूर्य वीर शिरोमणी श्री महाराणा प्रताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला गेला पाहिजे, अशी सकल राजपूत समाजाची मागणी होती, त्यानुसार जालना शहरातील मस्तगड भागात महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्याचा ठराव सन २००५ मध्ये भास्कर अंबेकर हे नगराध्यक्ष व आपण उपनगराध्यक्ष असतांना नगर पालिकेत एकमताने संमत झाला होता. हा पुतळा उभारला जावा, यासाठी सकल राजपूत समाजाने




महाराणा प्रताप स्मारक समिती स्थापन केली होती. या स्मारक समितीने सातत्याने पुतळा उभारण्यासाठी नगर पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. सन २०१७-१८ मध्ये तत्कालीन आमदार कैलास गोरंट्याल तसेच नगराध्यक्षा संगितताई गोरंट्याल यांनी पुढाकार घेत मस्तगड येथे नियोजित महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याच्या जागेवर फाऊंडेशनचे काम पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला. यानंतर राजपूत समाज व महाराणा प्रताप स्मारक समितीच्या वतीने सातत्याने महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्याची व त्याचे अनावरण करण्यासाठी प्रयत्न केले. पुतळा उभारणे व त्याच्या अनावरणासाठी काही बाबी आडव्या येत होत्या, त्यात गृहखात्याचे नाहरकत प्रमाणपत्र अडचणीची ठरत होती.याशिवाय काही बाबीही होत्या. आमदार अर्जूनराव खोतकर यांनी पुतळा उभारणी व अनावरणासाठी येणाऱ्या सर्व बाबींचा पाठपुरावा केल्याने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी महाराणा प्रताप यांच्या राज्यभिषेक दिनी आमदार अर्जूनराव खोतकर यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण पार पडले आहे. जालना शहरात महाराणा प्रताप यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याकामी प्रयत्न तसेच पाठपुरावा करणाऱ्या सर्व नेते मंडळीचे सकल राजपूत समाजाने आभार मानले असल्याचे ठाकूर यांनी यावेळी सांगितले. यावेळी महाराणा प्रताप स्मारक समितीचे अध्यक्ष लखनसिंह ठाकूर, सचिव सनी बुंदेले, सदस्य शक्तीसिंह राजपूत, देवेंद्र बुंदेले, मनोज देवरे विकी काबरे आकाश ताजी राजू राजपूत शिवम राजपूत लक्ष्मण वर्मा बालाजी राजपूत बजरंग राजपूत संतोष माधवले बाला परदेसी शेखर परदेशी पंकजा अंधारे मनोज पिछाडे आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### सर्वांगीण विकासाचा अर्थसंकल्प -माजी आ.अरविंद चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी शेती उद्योगाशी निगडित शेतीसाठी सिंचन,जलयुक्त शिवार, शेतकऱ्यांच्या मालाला शाश्वत बाजार पेठ, शेती साठी वीज धोरण, सौर कृषी पंप, बी - बियाणे-खते यासाठीचे नियोजन करून या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली. मराठवाड्यासाठी संजिवनी ठरलेल्या नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना (पोखरा) टप्पा - २ या योजनेला गती देण्यासंदर्भात मोठा निर्णय. रस्ते , दळ-णवळण, उदयोग अशा सर्वच कामांना निधीची तरतूद करून राज्याचा सर्वांगीण विकास प्रगतीपथावर नेणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी दिली.

### शेती, रोजगार आणि उद्योगाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प -आमदार अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महायुती सरकारचा अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी आज सादर केलेला अर्थसंकल्प सर्वांगीण विकासाला चालना देणारा आहे. विशेषतः दावोस येथे झालेल्या औद्योगिक करारामुळे सुमारे १६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात होणार आहे. त्यातून १६ लाख बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. शेतीसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. लाडक्या बहिणीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. सर्वांसाठी घरे ही योजना प्रभावीपणे राबविली जाणार आहे. व्यापार, शिक्षण,पर्यटन, सामाजिक विकास यावरही विशेष भर देण्यात आला आहे. खास करून आरोग्यावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पाच किलोमीटरच्या आत आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. महायुती सरकारने निवडणुकीत जी आश्वासने दिली त्याची येत्या पाच वर्षात पूर्तता करणारा हा अर्थसंकल्प असून सर्व समाजघटकांना न्याय देण्यात आला आहे. आज सादर झालेल्या अर्थसंकल्पातील तरतुदीमुळे सामान्य लोकातून समाधान व्यक्त होत आहे.

### व्यापारी सुरेश सारडा यांनी घेतली पो.नि.बिडवेंची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शहरातील प्रसिध्द व्यापारी सुरेश सारडा यांनी भोकरदन पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांची सदिच्छा भेट घेऊन विविध सामाजीक तसेच जालना जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या प्रश्नासदंर्भात चर्चा केली, यावेळी सारडा यांनी बिडवे यांचे पुष्प-गुच्छ देऊन स्वागत केले.

## जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध असलेला अर्थसंकल्प -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सन २०१७ पर्यंत भारत हे विकसित राष्ट्र व्हावे असा संकल्प पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी केला असून हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी महाराष्ट्र मोलाची भूमिका बजावेल त्यामुळे विकसित भारत विकसित महाराष्ट्र हे सूत्र घेऊन महाराष्ट्राच्या विकासाच्या कराला गती देणारा तसेच उद्योग पायाभूत सुविधा कृषी व संलग्न क्षेत्र सामाजिक व इतर क्षेत्रात विकास-ासाठी महत्त्वाच्या तरतुदी करणारा अर्थसंकल्प महाराष्ट्र सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री श्री अजित पवार यांनी सादर केला आहे. महाराष्ट्रात थांबणार नाही विकास आता लांबणार नाही असा संकल्प करत महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा विचार मांडणारा अर्थसंकल्प तसेच शेती, रोजगार, रस्ते, वीज, सिंचन या माध्यमातून शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध असलेला अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला अशा शब्दात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आजच्या अर्थसंकल्पाचे कौतुक केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद पडेल असा फेक नरेटीव



पसरवण्याचा काम विरोधकांच्या माध्यमातून केलं जात होतं हा अर्थसंकल्प म्हणजे विरोधकांच्या या फेक नरेटीवला सणसणीत चपराक असल्याची प्रतिक्रिया देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. सन २०२५-२६ वर्षासाठी गृह विभागासाठी २२३७ कोटी रुपये, उत्पादन शुल्क विभागासाठी १५३ कोटी रुपये, विधी व न्याय विभागासाठी ७५९ कोटी रुपये महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयासाठी ५४७ कोटी रुपये, नियोजन विभागासाठी ९६० कोटी ४५ लाख रुपये, वित्त विभागासाठी २०८ कोटी रुपये, महसूल व वन विभागासाठी २९८१ कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी १३६७ कोटी रुपये, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागासाठी ३१५९ कोटी रुपये, सामान्य प्रशासन विभागासाठी २८९९ कोटी रुपये, मराठी भाषा विभागासाठी २२५ कोटी रुपये, कृषी विभागास ९७१० कोटी रुपये, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व मत्स व्यवसाय विकासासाठी ६३५ कोटी रुपये, फलोत्पादन विभागास साठी ७०८ कोटी रुपये, मृद जलसंधारण विभागासाठी ४२४७ कोटी रुपये, जलसंपदा विभागासाठी १६४५६ कोटी रुपये, मदत व पुनर्वसन विभागासाठी ६३८ कोटी रुपये, रोजगार हमी योजना विभागासाठी २२०५ कोटी रुपये, सहकार व पणन विभागासाठी ११८ कोटी रुपये, अन्न नागरी पुरवठा विभागासाठी ५२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे अशी माहिती देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

## ज्ञानगंगा इंग्लिश स्कूल वडीगोद्री येथे 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



तालुक्यातील वडीगोद्री येथे दि.८ मार्च २०२५ , वार- शनिवार रोजी वडीगोद्रि येथील ज्ञानगंगा इंग्लिश स्कूल मध्ये 'जागतिक महिला दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनीनी समाजातील सामाजिक व कर्तुत्ववान महिलांची वेशभूषा केली होती.यावेळी शाळेच्या शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले संस्कार व आपली संस्कृती हेच आपले सुरक्षा कवच असते.योग्य संस्कार व संस्कृतीचा अवलंब करुन समाजात वावरणाऱ्या आज उच्च पदावरती कार्यरत आहे.त्यांचा आदर्श घेऊन आ-पणही आपले संस्कार व संस्कृती जपत आपले ध्येय मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.असे मत शाळेच्या शिक्षिका यांनी व्यक्त केले. कर्तुत्ववान महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपणही आपल्या देशाची समाजाची सेवा घडेल असे कार्य करण्याचे आव्हानही त्यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष श्री.सोमनाथ काळे,मुख्यधापक- सुनिल काळे, एच.ए.गावडे, बी.डी.कनके, डी.एस.सुर्या, एन.एस.गावडे, एन.व्ही.लाहुरे, व्ही.बी.गावडे, आर.पी.वाघ, के.पी.लिपने, के.डी.काळे, एक.व्ही.शिंदे, एक.एस.कातकडे, पी.एस.शिंदे, एच.जी.नाटकर, एस.ए.सावळे, पि.के.घाडगे, जाधव विद्यार्थिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## डॉ.आंबेडकर नसते तर या देशाला स्त्रीवादाची शिकवण देखिल मिळाली नसती -ॲड.सुषमा मोरे

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

येथिल सिद्धार्थ महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त सन्मान महिला कर्तृत्वाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.०८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस महाविद्यालयातील कार्यरत महिला विकास कक्ष, लैंगिक छळ प्रतिबंध समिती,मूल्य शिक्षण समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ र.तु.देशमुख हे होते, प्रमुख पाहुणे वया कार्यक्रमाच्या व्याख्याते म्हणून जाफराबाद येथिल न्यायालयात कार्यरत



असलेल्या विधीज्ञ ॲड.श्रीमती सुषमा मोरे ह्या होत्या.ॲड.सुषमा मोरे यांनी आपल्या भाषणात म्हणाल्या, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपली योग्य भूमिका बजावून यशस्वीपणे आपले कर्तृत्व जगाला दाखवून दिले.ही किमया फक्त भारतीय संविधानामुळे झाली. सदरिल कार्यक्रमास विशेष उपस्थिती मध्ये वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राचार्य प्रोफेसर डॉ सुनील मेढे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी श्री.स्वप्नील पवार, श्री.उमेश भूमकर यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध, राष्ट्रमाता जिजाऊ, रमाबाई आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कु.दिव्या तायडे हिने स्वागतगित गायले.

## जिथे स्त्रीचा सन्मान होतो तिथेच समाजाची प्रगती होते -माजी आ.सुरेशकुमार जेथलिया

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

स्त्री ही केवळ एक नात्यात बांधलेली व्यक्ती नाही तर ती शक्ती, प्रेरणा आणि परिवर्तनाची वाहक सुद्धा आहे. असे प्रतिपादन माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांनी केले. माजी नगराध्यक्षा विमलताई जेथलिया यांनी आयोजित केलेल्या महिला दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शनिवारी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विमलताई जेथलिया यांच्या हस्ते शहरातील महिलाचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी आमदार सुरेशकुमार जेथलीया,राष्ट्रवादी



काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रवींद्रतात्या तौर व बळीरामजी कडपे, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष वंदना खांदेभराड, बाबाजी गाडगे, डॉ. प्रमोद जगताप, आगारप्रमुख माधुरी देशमुख,अंजली कोळकर, पोलीस कॉ,सपना वाघ,अन्वर ऊनिसा सिद्दीकी , विश्रांती पेटु, लता सदावर्ते,याची व्यासपीठावर उपस्थिती होती. जागतिक महिला दिनाचे महत्व,महिलांना समाजात योग्य असा सन्मान मिळाला पाहिजे, भारतीय संस्कृतीत महिलांना अस-लेले मानाचे स्थान आदी मुद्द्यावर विचार व्यक्त करण्यात आले.

यावेळी श्रीमती माजी नगराध्यक्ष सुनंदा शहाने ,सामाजिक कार्यकर्त्या संजना पाडेवार ,ॲड. ज्ञानेश्वरी पुरी,डॉ कराड, डॉ ,रोहीणी गायकवाड,संगीता भुजबळ, मरीयनबी अन्सारी,अनुजा गारकर, डॉ,लता पुरी,पुनम लाहोटी, सुप्रीया मंत्री, सुनिता शेळके, आशा केसरखाने, पुष्पा पाटील, सुनिता खंडेलवाल, मिनाक्षी काकडे,शोभा अग्रवाल,यांच्यासह शहरातील महिलांचा यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला माजी नगरसेवक राजेश खंडेलवाल, अविनाश शहाणे, तारेख सिद्धिकी,अर्जुन पाडेवार,राजेश मंत्री,मतीन कुरेशी,विकास झरेकर,यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गजानन राजबिंडे यांची रयत क्रांती संघटनेच्या मराठवाडा विभाग युवा अध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



राज्यामध्ये शेतकऱ्यांची चळवळ ही रयत क्रांती संघटना पुढे घेऊन जाऊ शकते. रयत क्रांती संघटना ही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम करणारी संघटना आहे, म्हणून रयत क्रांती संघटनेचे शेतकऱ्यांच्या चळवळीतील योगदान हे खूप मोठे आहे, असे मत माजी मंत्री आमदार सदाभाऊ खोत यांनी पुणे येथे विस्तारित राज्य कार्यकारणी मध्ये व्यक्त केले.

पुणे येथे रयत क्रांती संघटनेची विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये नूतन राज्याची कार्यकारणी तयार करण्याची तयार करण्यात आली. यामध्ये परतूर तालुक्यात शेतकऱ्यांसह जन-सामाण्यांच्या समस्या साठी रस्त्यावर उतरून न्यायासाठी झटणाऱ्या गजानन राजबिंडे यांची रयत क्रांती संघटने च्या मराठवाडा विभाग युवा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्याबद्दल रयत चे अध्यक्ष सदाभाऊ खोत व सर्व वरिष्ठांनी राजबिंडे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या निवडीबद्दल परतूर तालुक्यातील रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यां कडून गजानन राजबिंडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

## स्त्रीशक्तीचा जागर; कर्तबगार महिलांचा सन्मान

# महिलांनी स्वकर्तृत्वाने सर्व क्षेत्र काबीज केले -नगराध्यक्षा वंदनाताई बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

महिलांनी आज आपल्या कर्तृत्वाने सर्व क्षेत्र काबीज केले आहे.आपण काम करत असलेल्या क्षेत्रात सर्वोच्च काम आपण करावे.आपली स्वतःची नाविन्यपूर्ण ओळख निर्माण करावी. महिला भगिनींनी काम करत समाज व कुटुंबाच्या प्रगतीस हातभार लावावा. असे प्रतिपादन नगराध्यक्षा वंदनाताई वैजनाथ नाना बोराडे यांनी केले. त्या नगरपंचायत व ग्रामीण रुग्णालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांत बोलत



होत्या. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तुत्वान महिलांच्या कार्याचा गौरव करत उत्कृष्ट कार्याबद्दल ५१ महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेविका यमुनाताई नारायण दवणे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर निकिता निकम , लिपिक श्रीमती पल्लवी आळसपुरे , पो-लीस हेडकॉन्स्टेबल सविता फुलमाळी , कल्पना डोईफोडे , परिसेविका मीना पालवे,पो.कॉ. सुलाबाई मार्कड यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.निकिता निकम व त्यांच्या सहकाऱ्यांनी नगराध्यक्ष बोराडे यांचे आभार मानून ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने सत्कार केला. यावेळी डॉक्टर निकिता निकम यांनी बोलताना सांगितले की , महिलांनी स्वतः च्या आरोग्याची विशेष काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे , हे स्पष्ट केले. मानसिक , शारीरिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम व संतुलित आहार आणि ताण-तणाव व्यवस्थापन यावर भर द्यावा , असे त्यांनी सांगितले. नगरसेविका यमुनाताई दवणे यांनी महिलांच्या सर्व क्षेत्रातील योगदान सविस्तरपणे विशद केले. यावेळी पोलीस हेडकॉन्स्टेबल सविता फुलमाळी यांनी सांगितले की , प्रत्येक पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री असते एका स्त्रीला घर सांभाळून प्रत्येक जबाबदारी पार पाडावी लागते. आयुष्यात प्रत्येक अडचणीला तिला सामोरे जावे लागते , त्यामुळे प्रत्येक पुरुषाने स्त्रीचा सन्मान केला पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पो-लीस कॉन्स्टेबल संगीता मांडे , प्रियंका राठोड , अधिपरिचारिका श्रद्धा हजबे , परवीन सय्यद , शिल्पा बोरकर, सिमा शेळके, श्रीमती मयुरी झोड , श्रीमती प्रतिक्षा वाघमारे , विद्या मोरे , दिपाली कल्याणकर , चंद्रकोर राठोड यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रस्त्यासाठी गावकऱ्यांनी केला रस्ता रोको !

## बोगस काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी






तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१० मार्च – तालुक्यातील चिकलठाण रस्त्याचे काम संथ गतीने आणि निकृष्ट दर्जाचे होत असल्याने संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी अखेर राष्ट्रीय महामार्गावर दि.१० रोजी रस्ता रोको केला होता

कन्नड चिकलठाण रस्ता अनेक वर्षांपासून खड्डेमय झाला होता अखेर या रस्ताच्या कामाला मुहूर्त लागला पण त्यातही रस्त्याच्या कामाला विलंब सुरू झाला या मार्गावर वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने काना डोळा केल्याने अखेर वैतागलेल्या ग्रामस्थांनी लोकशाही मार्गाने रास्ता रोको करत आंदोलन केले,यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकरी अभियंता प्रशांत येरने यांनी लेखी आश्वासन देत आठ दिवसांत या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावतो असे पत्र दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलना स्थगिती दिली,यावेळी कन्नड शहर पोलिस स्टेशन येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाक सूर्यवंशी सह पोलिसांचा फौजफाटा तैनात होता.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६२) **विरासत**

डॉक्टरजींनी विशेष रूपाने समर्थ रामदासांद्वारे रचित दासबोध व लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिलेले गीतारहस्य यातून गहन बौद्धिक प्रेरणा मिळवली होती. विदेशी अक्रांतांच्या हल्ल्याचा सामना करण्यासाठी समर्थांनी एकूण ११०० मठ स्थापन केले होते व शक्ती-बुद्धि-बल देणाऱ्या मारुतीची पूजा केली होती. डॉक्टरांनी सुद्धा जागोजागी स्वयंसेवकांची शाखा उभे केली होती. व राष्ट्रभक्तीसाठी भारत मातेची पूजा केली होती. गुरु रामदासांकडून मार्गदर्शन घेऊन शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला संघटित केले. आंतरिक कलह आणि मतभेदांना तिलांजली दिली होती. हे दोघेही सद्गुरू कर्मयोगी बना, नुसती शब्दांची हवा फेकू नका, असा संदेश देत असत. डॉक्टरांनी डायरीत समर्थ रामदासांची वचने लिहिली होती. ती डायरी नंतर श्री गुरुंजीजवळ होती. डॉक्टरजी शुभम् करोति कल्याणम्।

श्रीरामरक्षा। शाखेत म्हणत असत पत्राच्या मध्यभागी 'श्री' लिहीत असत. व त्याखाली संत तुकारामांचा दया तिचे नाव, भूतांचे पालन, आणिक निर्दालन कंटकांचे असे लिहीत असत. व त्यानंतर पत्र प्रपंच करायचे. अर्थात केवळ अहिंसा / अनुकंपेनी समाजाचे कल्याण होणार नाही. तर येणाऱ्या संकटांचा समूळ नाश महत्त्वपूर्ण आहे, हे समजावून सांगताना म्हणत, कोणत्याही राष्ट्राचा इतिहास हा त्या राष्ट्राचा प्राण असतो. समर्थ रामदास स्वतःसाठी काहीच मागत नव्हते. ते समाजाचे कल्याण व उत्तम आत्मबोधासाठी प्रयत्नशील होते. तोच आदर्श डॉक्टरजींचा पण होता. थोडक्यात आम्हाला आमच्या विरासतीवर गर्व हवा, हे डॉक्टरजी पटवून देत असत. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## महीला दिनानिमित्त कष्टकरी भगिनीचा सन्मान



बिडकीन दि १० मार्च : जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर माता-भगिनींनी स्वकर्तृत्वावर प्रत्येक क्षेत्रात मोठा ठसा उमटविला असुन सावित्रीमाई फुले यांच्या महिला शिक्षणाच्या लढ्यामुळे जिजाऊंच्या लेकींनी चूल आणि मूल हि बाब मोडीत काढत विविध क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून योगदान दिलेले दिसुन येते.मात्र दुर्दैवाने शिक्षणापासून वंचित राहीलेल्या अनेक माता- भगीनी बांधकाम , शेतीकाम , घरकाम आदी कष्टाची कामे करून आपल्या संसाराचा गाडा यशस्वी ओढतांना देखील दिसतात अशाच प्रकारे बिडकीन शहरात आठ दहा ठिकाणी धुणीभांडी करून परिवाराचा उदरनिर्वाह करणाऱ्या एका भगीनीचा साडीचोळी, मिठाई देत जागतिक महिला दिनानिमित्त आज आनंदेश्वरी सेवाभावी संस्था व स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने महिला कर्मचारी पुजा कोठाळे यांच्या हस्ते कष्टकरी भगिनीचा सन्मान करण्यात आला. यावेळी आनंदेश्वरी सेवाभावी संस्था अध्यक्ष विजय शेजुळ , सेवानिवृत्त विस्तारअधिकारी कडुबाळ फासाटे , स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था सचिव सचिन हाडे , व्यवस्थापक ज्ञानेश्वर औटी , रामेश्वर कुऱ्हाळ आदी उपस्थित होते.

### गंगापूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व वरिष्ठ दिवाणी न्यायालयाचे उद्घाटन संपन्न.पंधरा वर्षापासूनच्या मागणीला यश

# जनतेचा न्याय देवतेवरील विश्वास ढळणार नाही, असे काम न्यायाधिशांनी करावे : न्या. रविंद्र घुगे



तभा वृत्तसेवा,

गंगापूर दि.१० : गंगापूर तालुक्यातील वकिलांना वैजापूर येथे पक्षकारांना न्याय मिळवण्यासाठी जावे लागत असे त्यामुळे वकील आणि पक्षकार यांचा वेळ आणि पैसा खर्च होत होता त्यामुळे पंधरा वर्षापासून गंगापूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय वरिष्ठ दिवाणी न्यायालय व्हावे अशी मागणी वकील संघाकडून करण्यात येत होती या मागणीला यश मिळाले व गंगापूर येथे दोन्ही न्यायालयाचे रविवारी उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे गंगापूर वकील संघाकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

जनतेचा न्याय देवतेवरिल विश्वास ढळणार नाही, असे काम न्यायाधीशांनी करावे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांनी केले. गंगापूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरचे उद्घाटन रविवार (दि. ९) मार्च रोजी दुपारी न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय देशमुख, न्यायमूर्ती खोब्रागडे, औरंगाबाद जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीश विभा इंगळे, गंगापूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे नवनियुक्त न्यायाधीश सुभाष क-हाळे, दिवाणी न्यायालय कार्यालय वरिष्ठ स्तरचे न्यायाधीश चंदन काशीद यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन दिपप्रज्वलन करून करण्यात आले. गंगापूर वकील संघाचे अध्यक्ष ड.किशोर क-हाळे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, गेल्या पंधरावर्षांपासून आम्ही गंगापूर येथे जिल्हा न्यायालयाची मागणी करत होतो. खुप प्रयत्नानंतर आज ती मागणी पूर्ण झाली आहे. याचा सर्व पक्षकारांना फायदा होणार आहे. यामुळे वेळ व पैशाची बचत होईल. जिल्हा न्यायालय सुरू करण्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केली, त्यांचे ड.किशोर क-हाळे यांनी आभार मानले.या प्रसंगी न्यायमूर्ती संजय देशमुख, न्यायाधीश विभा इंगळे यांची समायोचित भाषणे झाली. यावेळी आ.प्रशांत बंब, उपविभागीय अधिकारी अरुण ज-हाड, तहसीलदार नवनाथ वगवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या सह विधिज्ञ, बांधकाम विभागाचे अधिकारी,वकील व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. गंगापूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे नवनियुक्त न्यायाधीश सुभाष क-हाळे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## सोयगावच्या तहसील कार्यालयात विविध विभागातील अनियमितता थांबवा – भाजपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



सोयगाव,दि.१० (प्रतिनिधी

तहसील कार्यालयात तहसीलदार मुख्यालयी न राहता छत्रपती संभाजीनगर येथून अपडाऊन करतात.त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण नाही मुख्यालय न राहणाऱ्या तहसीलदार व आदी अधिकारी कर्मचाऱ्यांचे घर भाडे भत्ता बंद करण्यात यावा तसेच विविध मागण्या संदर्भात भारतीय जनता पार्टी सोयगाव तर्फे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना सोयगाव तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे सोयगाव येथे शासकीय आढावा बैठकीस आले असता त्यांना भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांचा यथोचित सत्कार केला.तसेच प्रशासना संदर्भात विविध मागण्यांचे निवेदन दिले.या निवेदनात सोयगाव तहसील कार्यालयात नियुक्तीस असलेल्या तहसीलदार या छत्रपती संभाजी नगर येथून अपडाऊन करतात.त्या कार्यालयात दुपारी दोन वाजे नंतर येतात व कार्यालय सुटण्यापूर्वीच कार्यालयातून चार वाजेला निघून जात असल्याने तालुका प्रशासनावर कोणताही वचक राहिलेले नाही.सर्व कर्मचारी अपडाऊन मध्ये आपला वेळ घालवत असल्यामुळे जनतेची कामे होत नसल्याने कुचंबना होत आहे. मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे घर भाडे भत्ते थांबविण्यात यावे,

सोयगाव तहसील कार्यालयातील सर्व विभागातील सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ चालू करण्यात यावे,

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष बद्री राठोड,भाजपा सोयगाव शहराध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील,सुनील गावंडे,माजी सरपंच वसंत बनकर,मंगेश सोहणी,मयुर मनगटे,संजय तायडे,संजय पाटील,संजीवन सोनवणे आदींची निवेदनावर स्वाक्षरी आहेत,सह निवेदन देताना भाजपा पदाधिकारी उपस्थिती होती.


## बिडकीन दुर्गा इंग्लिश स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



बिडकीन दि १० मार्च – दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज बिडकीन येथे मोठ्या उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, काकासाहेब टेके,वाकिल विक्रम उंदरे ,बिडकीन ग्रामपंचायत सदस्य , गावातील प्रतिष्ठित नागरिक , पालक यांची उपस्थिती लाभलेली होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून विद्येची देवता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले, शाळेचे संस्थापक ओमप्रकाश जैस्वाल व शाळेचे सचिव राजेंद्र जैस्वाल, रोशन जैस्वाल,प्राचार्य अभिजित इंगळे ,मयुर स्वामी ,यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच कार्यक्रमाला जमलेल्या सर्व पालकांचे शब्दसुमनांनी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याला साजेशा निरनिराळ्या वेशभूषा करून मनमोहक नृत्य सादर केले. जसे की छत्रपती शिवाजी महाराज, महाभरात, विठ्ठल, ईद विषयी तसेच सर्वधर्म समभाव, देशभक्ती यांचे वेगवेगळ्या पद्धतीने मुलांनी सादरीकरण केले. उपस्थित असलेल्या प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी मुलांना बक्षीस देऊन त्यांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# यूजीईटी २०२५ प्रवेश परीक्षांसाठी अर्ज करण्याची तारीख जाहीर

## ४०० हून अधिक केंद्रांवर १.२ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसण्याची अपेक्षा



छत्रपती संभाजीनगर : कॉमेडके यूजीइटी / यूनिगेज २०२५ प्रवेश परीक्षा शनिवार, १० मे २०२५ रोजी होणार आहे. ही परीक्षा कर्नाटकातील १५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालये आणि देशभरातील ५० हून अधिक खाजगी आणि स्वयं-अनुदानित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यासाठी घेतली जाते. कुपेका आणि युनिगेजशी संलग्न संस्थांमध्ये बी.ई./बी.टेक.च्या प्रवेशासाठी हे आयोजित केले जाते.

ही ऑनलाइन परीक्षा भारतातील २०० हून अधिक शहरांमधील ४०० हून अधिक केंद्रांवर घेतली जाणार आहे. यामध्ये १.२ लाखांहून हून अधिक विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. १५ मार्च, २०२५ हि अर्ज करण्याची शेवटची तारीख असल्याचे कॉमेडकेचे कार्यकारी सचिव डॉ. कुमार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले .या वेळी ईआरए फाउंडेशनचे सीईओ पी. मुरलीधर हे उपस्थित होते.

२०२२ मध्ये, कॉमेडकेने विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढविण्यासाठी विविध अभ्यासक्रम प्रदान करून विद्यार्थ्यांना कार्यबलासाठी तयार करण्यासाठी ८ कॉमेडके केअर्स इनोव्हेशन हब सुरू केले. कॉमेडकेकडे आता कर्नाटकात १० इनोव्हेशन हब आहेत, त्यापैकी ४ बेंगळुरूमध्ये आहेत आणि उर्वरित म्हैसूर, कलबुर्गी, मंगलोर, बेळगाव, तुमकुरु आणि हुबळी येथे आहेत. ही केंद्रे ५,००० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेली आहेत आणि लाकूड राउटिंग, जलद प्रोटोटाइपिंग, लेसर कटिंग, ३डी प्रिंटर, एआर/व्हीआर तंत्रे इत्यादी आधुनिक साधनांनी सुसज्ज आहेत. इनोव्हेशन हब आधुनिक क्षेत्रांवर केंद्रित आहेत जसे की - आर्टिफिशियल इंटेलिजेंस अँड मशीन लर्निंग (एआयएमएल), रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), इनोव्हेशन अँड डिझाइन थिंकिंग (आयडीटी), असल्याचे या वेळी सांगितले.

## महाबली शहाजीराजे भोसले यांची ४३१जयंती वेरूळ येथे मोठ्या उत्साहात होणार संपन्न



खुलताबाद प्रतिनिधी : स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज जयंती महोत्सव २०२५ वार्षिक महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे या संदर्भात आज मालोजीराजे भोसले गढी श्रीक्षेत्र वेरूळ येथे अनेक शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न झाली बैठकीचे प्रास्ताविक घृष्णेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष योगेश टोपरे यांनी केले यावेळी पुंजाजी अण्णा, महेश उबाळे, प्रकाश वाकळे ,गणेश नाना अधाने,शिवम सोनवणे अशा अनेक शिवभक्तांनी मनोगतात सांगितले की शहाजीराजे महाराज जयंती मोठ्या संख्येने उत्साहात साजरी करायची आहे त्यासाठी जी जबाबदारी आमच्यावर येईल तीपार पाडण्यास आम्ही तयार आहोत जागतिक दर्जाचा विकास या गढीचा होणे गरजेचे आहे यासाठी भरीव निधीची तरतूद शासनाने करावी आणि येथे शहाजीराजे महाराजांचा तसेच भोसले घराण्याचा इतिहास सांगणारे भव्यदिवे म्युझियम तयार व्हावे असे मत अनेकांनी मांडले,यावेळी कार्यकारणी पुढीलप्रमाणे निवडण्यात आले स्वागत अध्यक्ष :-प्रकाश पाटील मिसाळ , उपाध्यक्ष:-श्री किरण पाटील डोणगावकर ,कृष्णा पाटील डोणगावकर ,संतोष माने,सचिन पवार ,गणेश नाना आधाने, परसराम पाटील बारगळ ,प्रकाश वाकळे, राजू वरकड, एल जी गायकवाड, अनिल भाऊ श्रीखंडे,महेश उबाळे, अनिल चव्हाण विशाल खोसरे.

मान्यवरांच्या शुभहस्ते दोन दिवसीय शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन मार्गदर्श संपन्न होईल अशा भव्य दिव्य स्वरूपात जयंती महोत्सव संपन्न होणार आहे अशी माहिती स्वराज्य संकल्पक शहाजीराजे जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी दिली बैठकीसाठी आलेल्या शिवभक्तांचे आभार परसराम पाटील बारगळ यांनी मानले याप्रसंगी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी किशोर काळे, संजय वैद्य,विजय भालेराव ,कडुबा सोष्टे,मदन राठोड सागर पाटील मतकर, , योगेश टोपरे,मोहन गवळी, ,, मूलचंद चव्हाण, राजू चव्हाण, विनोद ढीवरे,अरुण गोल्हार, गणेश काजे, अप्पाराव नागे, जनार्दन अधाने,शिवा अंभोरे, संजय श्रीखंडे ,एकनाथ जाधव, विलास काळे, संदीप मोडके, गणपतराव म्हस्के दयानंद पाटील फुलारे यासह अनेक शिवभक्तांची उपस्थिती नियोजन बैठकीला होती.

## 'सुसंस्कृत? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

### यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

छत्रपती संभाजीनगर, दि. १० : यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त 'सुसंस्कृत ? राजकारणाचा मराठवाडा पॅटर्न' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. ज्येष्ठ पत्रकार व स्तंभलेखक सुहास सरदेशमुख हे याप्रसंगी आपले विचार व्यक्त करणार आहेत. चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

बुधवार, दिनांक १२ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता एमजीएम वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या आचार्य विनोबा भावे सभागृहात सदरील व्याख्यान संपन्न होईल.

मागील वर्षभरात मराठवाड्यात सातत्याने विविध गुन्हेगारी घटना घडत आहेत. दिवंगत संतोष देशमुख यांची हत्या, सोमनाथ सूर्यवंशी यांचा कोठडीतील संशयास्पद मृत्यू यांसह अनेक गुन्ह्यांमध्ये राजकीय सहभाग दिसून आलेला आहे. या सर्व सहभागाच्या निमित्ताने जो नवा राजकीय पॅटर्न जन्माला येत आहे त्याचा ऊहापोह या व्याख्यानाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला सुसंस्कृत राजकारणाची परंपरा दिली. त्याच राज्यात आज राजकारणाचा मार्ग नेमकी कुठली दिशा धारण करतोय याबद्दल विचार करणे गरजेचे बनले आहे. त्यामुळे या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी खुला असून, सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा केंद्राचे कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव नीलेश राऊत, डॉ.अपर्णा कक्कड, प्राचार्या डॉ रेखा शेळके,सुहास तेंडुलकर, डॉ रुपेश मोरे,प्रेरणा दळवी,सुबोध जाधव,गणेश घुले,राजेंद्र वाळके,वैशाली बाविस्कर, श्रीकांत देशपांडे आदींनी केले आहे.

# संत एकनाथमहाराजांचे नावे देण्यात येणारे २०२५ चे सहा पुरस्कार जाहीर



तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- यंदाचा सर्वोच्च भानुदास एकनाथ पुरस्कार संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व संत तुकाराममहाराजांचे वंशज डॉ श्री सदानंद मोरे यांना देण्यात येणार आहे.

संत एकनाथमहाराजांचा प्रसार प्रचार व्हावा या उद्देशाने शांतिब्रह्म श्रीएकनाथमहाराज मिशन, पैठण ही सामाजिक संस्था इ.स. २००६ पासुन कार्यरत आहे. संस्थेद्वारा आजपर्यंत अनेकानेक उपक्रम राबविण्यात आले असुन इ.स. २०१८ पासुन संत एकनाथमहाराजांचे नावे प्रतिवर्षी एकुण सहा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येतात.

यंदाचा सर्वोच्च भानुदास एकनाथ पुरस्कार संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व संत तुकाराममहाराजांचे वंशज डॉ श्री सदानंद मोरे यांना देण्यात येणार असुन श्रीफळ, ताम्रपट मानपत्र, नाथांचा फेटा, रुपये पंचवीस हजार, नाथांची मूर्ती, एकनाथी भागवत असे पुरस्काराचे स्वरूप राहील.

संत एकनाथमहाराज संस्थानचे संस्थापक व अधिपती नाथवंशज हभप वै. श्री रंगनाथबुवा ऊर्फ भैय्यासाहेबमहाराज पैठणकर यांचे नावाने देण्यात येणारा दुसरा वारकरी भूषण पुरस्कार हा श्री नेकनुरच्या बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती हभप श्री लक्ष्मणमहाराज मेंगडे यांना देण्यात येणार आहे. श्री संत एकनाथमहाराज प्रबोधमार्तंड पुरस्कार हा श्रीसंत निवृत्तीनाथमहाराज संस्थानचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध कीर्तनकार हभप श्री संजयनाना धोंडगे यांना, संत एकनाथमहाराज स्वरमार्तंड पुरस्कार हा वारकरी संप्रदायातील जेष्ठ उपासक आळंदी येथिल हभप श्री आबामहाराज गोडसे यांना, संत एकनाथमहाराज तालमार्तंड पुरस्कार हा पुणे येथिल मृदंगाचार्य श्री तुकारामजी भुमकर यांना तर संत एकनाथमहाराज वारकरी सेवा पुरस्कार हा पैठण येथे नाथ समाधी मंदिर परिसरात भाविकांना गेल्या अनेक वर्षांपासुन विनामोबदला सायंकाळी अन्नदानाची सोय करणाऱ्या श्री राजुसेठ लोहिया यांना प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार दिनांक २१ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गावातील नाथमंदिर परिसरातील श्रीसंत नरहरी सोनार महाराज संस्थान येथे संपन्न होणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मिशनचे संस्थापक अध्यक्ष नाथवंशज हभप योगिराज महाराज गोसावी पैठणकर यांनी केले आहे.

## टॉप फुटवेअर ब्रँड मीशोवर लॉंच झाले

पुणे – भारतातील एकमेव खऱ्या ई-कॉमर्स मार्केटप्लेस असलेल्या मीशोने आपल्या प्लॅटफॉर्मवर रिलॅक्सो ग्रुप, पॅरागॉन आणि लिबर्टी ब्रँड सादर करून फुटवेअर श्रेणीचा विस्तार केला आहे, ज्यामुळे लाखो खरेदीदारांना विश्वासार्ह ब्रँड्सची सुविधा मिळाली आहे. हे महत्त्वपूर्ण पाऊल मीशोच्या ब्रँडेड, उच्च-गुणवत्तेच्या पादत्राणे प्रदान करण्याच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून आले आहे, विशेषतः टियर २+ बाजारपेठांमध्ये जिथे ग्राहकांना आराम आणि टिकाऊपणासाठी विश्वसनीय ब्रँड खरेदी करायचे आहेत.या ब्रँड्सच्या ऑर्डरमध्ये खूपच कमी कालावधीत मोठी वाढ झाली आहे, ज्यामध्ये रिलॅक्सो ग्रुपने २.५ पट, पॅरागॉनने २.५ पट आणि लिबर्टीने २ पट वाढ नोंदवली आहे. ही वाढ फ्लिप-फ्लॉप, कॅज्युअल शूज, स्पोर्ट्स शूज आणि फॉर्मल फूटवेअरच्या वाढत्या मागणीमुळे झाली आहे, विशेषतः महवा, भाटापारा, सुपौल आणि नुझविद सारख्या टियर-३ शहरांमध्ये. यावरून असे दिसून येते की मीशो टियर ३+ मार्केटमध्ये प्रवेश करून या ब्रँडना वाढत्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास सक्षम करत आहे.

# 'पीसीओएस'पासून बचावासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब गरजेचा : डॉ संजीव खुर्द



पुणे : बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांच्या पीसीओएस म्हणजेच पॉलिसिस्टिक ओवेरियन सिंड्रोम विषयीच्या तक्रारींमध्ये वाढ होत आहे.यासाठी तरुणी व महिलांनी स्वतःच्या आरोग्यकडे विशेष लक्ष द्यायला हवे. औषधांपेक्षा निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे. जंक फूड कमी करुन घरचे अन्न खाणे तसेच ८० टक्के सात्विक आहार व २० टक्के व्यायाम करणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे,असे मत ज्येष्ठ वैद्यकीय तज्ञ डॉ संजीव खुर्द यांनी व्यक्त केले.

अॅक्युअर लाईफ सायन्स फाउंडेशन आणि डॉ. खुर्द गायनॅक इंडॉस्कॉपी व आयव्हीएफ सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एरंडवणे भरत कुंज कॉलनी येथील डॉ. खुर्द हॉस्पिटल येथे पॉलिसिस्टिक ओवेरियन सिंड्रोम (पीसीओएस) विषयी जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले.यावेळी फाऊंडेशनचे डॉ शंतनु जोशी,डॉ साधना खुर्द, डॉ आदित्य खुर्द आदी उपस्थित होते. स्त्रियांकरिता मोफत वैद्यकीय शिबीर, व्याख्यान व समुपदेशनाद्वारे याविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच याविषयी माहिती देणारे फलक लावून प्रदर्शनाचे देखील आयोजन करण्यात आले.

डॉ संजीव खुर्द म्हणाले, अनेक तरुणी व महिलांमध्ये अनियमीत पाळी ही तक्रार असते.याशिवाय तारुणपिटीकांमध्ये अडचणी आणि वंधत्व या तीन विषयांमध्ये पीसीओएस आढळतो.हा कोणत्याही प्रकारचा रोग नसून सिंड्रोम आहे.अनेक आजार एकत्रितपणे हे म्हणजे सिंड्रोम. याकरिता योग्य आहार आणि व्यायाम महत्वाचा आहे. पीसीओएस हा स्त्रियांमध्ये १० ते २० टक्के या प्रमाणात आढळणारा,आधुनिक जीवनशैलीमुळे वाढत जाणारा आणि वंध्यत्वाच्या अनेक कारणांपैकी एका महत्वाचे कारण असणारा आजार आहे.

## लीजेंड्स ऑफ शिवा विद अमीश

मुंबई : वार्नर ब्रदर्स डिस्कवरी , जो नॉन-फिक्शन प्रकारात आघाडीवर आहे, अभिमानाने लीजेंड्स ऑफ शिवा विद अमीश या नवीन मालिकेची घोषणा करत आहे. प्रसिद्ध लीजेंड्स मालिकेतील ही नवी भर आहे. लीजेंड्स ऑफ़ रामायण च्या जबरदस्त यशानंतर येत असलेली ही तीन भागांची मालिका प्रेक्षकांना भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रवासावर घेऊन जाणार आहे. सुप्रसिद्ध लेखक अमीश त्रिपाठी यांच्या सूत्रसंचालनाखाली ही मालिका ३ मार्च २०२५ पासून दर सोमवारी रात्री ९ वाजता डिस्कवरी चैनल आणि डिस्कवरी वर प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्र, जिथे भगवान शिवाची काही पवित्र मंदिरे आहेत, हे या कथेत एक विशेष स्थान तयार करणार आहे. जिथे भक्ती आणि परंपरा अशा प्रकारे एकत्र येतात, जे इतर कोणत्याही ठिकाणी पाहायला मिळत नाही.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हटवादाला बळच मिळणार!

अमेरिकेच्या भरवशावर राजकारण करणाऱ्या आणि धोरण ठरवणाऱ्या देशाला कसे तोंडघशी पडावे लागते, याचे युक्रेन हे ज्वलंत उदाहरण ठरत आहे. रशियाविरुद्धच्या युद्धात अमेरिकेसह अवघे जग युक्रेनच्या पाठीशी उभे राहिले. मात्र, अमेरिकेत सत्तांतर झाल्यानंतर ट्रम्प यांनी युक्रेनच्या अध्यक्षांचा माध्यमांसमोर पाणउतारा केला, हे जगाने पाहिले. अमेरिकेची सत्ता एका विक्षिप्त, एककल्ली आणि हेकेखोर व्यक्तीकडे आल्याची फळे जग भोगते आहे. अमेरिकेत आठ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीत हिलरी क्लिंटन यांचा पराभव करण्यासाठी रशियाने केलेली मदत डोनाल्ड ट्रम्प विसरलेले नाहीत. रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतिन आणि ट्रम्प हे दोघेही युद्धपिपासू वृत्तीचे आहेत. त्यांचा शेजारच्या देशांवर डोळा आहे. रशियाने क्रिमियाचा घास घेतला. आता युक्रेनचे लचके तोडायचे असतील तर ट्रम्प यांना पनामा कालव्याची मालकी हवी आहे. कॅनडा आणि मेक्सिकोवर त्यांचा डोळा आहे. 'समान शीले व्यसने सुसख्यम' असे म्हटले जाते. पुतिन आणि ट्रम्प यांना या न्यायाने एकत्र आणले आहे. जागतिक फौजदारी करणारी अमेरिका आपल्या सोयीची भूमिका घेत असते. तिला दक्षिण आशियामध्ये चीनला शह देण्यासाठी भारताची गरज लागते. त्याचबरोबर शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांची झोळी भरण्यासाठी हा देश पाकिस्तानलाही मदत करत असतो. अमेरिकेच्या 'ओव्हल ऑफिस'मध्ये ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्यामध्ये झालेली जोरदार वादावादी अलिकडेच जागतिक चर्चेचा विषय बनली. असे असले, तरी पुतिन यांनी याबाबत एखादे वक्तव्यही केले नाही. ट्रम्प यांची भूमिका रशियाच्या हिताची असल्यामुळे पुतिन यांची जणू चांदीच झाली आहे. त्यांना काहीही बोलण्याची गरज राहिलेली नाही. पुतिन आतापर्यंत युक्रेनबाबत आक्रमक भूमिका घेत होते, ती भूमिका आता ट्रम्प घेत आहेत. ट्रम्प आधीच युक्रेनच्या अध्यक्षांना फटकारण्याचा विचार करत होते. झेलेन्स्कीसोबतची आपली भेट जगभरात चर्चेचा विषय ठरेल, असे ते म्हणाले होते. त्यामागेही खनिज व्यवहार हेच कारण होते. खनिज व्यवहाराबाबत युक्रेन आपली पावले मागे घेत आहे. अमेरिकेशी खनिज करार केल्याच्या बदल्यात त्यांना रशियन हल्ल्यांपासून सुरक्षिततेची हमी हवी होती.

कोणताही देश तेवढी अपेक्षा बाळगणारच; परंतु अमेरिकेला युक्रेनचा खनिज साठाही हवा आहे आणि पुतिन यांना आवरही घालायचा नाही. त्यामुळे झेलेन्स्की यांची भूमिका चुकीची नाही. संयुक्त राष्ट्र संघात अमेरिकेने रशियाच्या विरोधात भूमिका घेण्याचे टाळले, तेव्हाच ट्रम्प यांच्या पुढील धोरणाची दिशा काय असेल, हे स्पष्ट झाले होते. ट्रम्प म्हणतात की, अमेरिकेने युक्रेनसाठी आतापर्यंत जे काही केले आहे, त्याची किंमत खनिज पदार्थांच्या व्यवहारांमधून चुकवावी लागेल. रशियाचे माजी अध्यक्ष आणि सध्याचे सुरक्षा परिषदेचे उपप्रमुख दिमित्री मेदवेदेव यांनी सांगितले की, झेलेन्स्की यांना 'ओव्हल हाऊस'मध्ये थापड मारण्यात आली. अमेरिकेने कठोर कारवाई करून युक्रेनला पूर्णपणे मदत करणे बंद करावे, असे ते म्हणाले. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प हे पुतिन यांच्याशी अतिशय सौम्यपणे वागत आहेत. या दोघांची सौदी अरेबियात भेट होऊ शकते, अशी चर्चा आहे. त्यांच्यात अनेक वेळा फोनवरूनही बोलणे झाले असून दोन्ही नेत्यांनी एकत्र काम करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. आर्थिक सहकार्याबाबत दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी भेटीगाठी सुरू केल्या आहेत. याशिवाय रशियानेही अमेरिकेला एक नवी ऑफर दिली आहे. झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यातील वादावादीनंतर अमेरिका रशियाची ऑफर स्वीकारू शकते. युक्रेनमध्ये खनिजे मुबलक प्रमाणात असलेल्या काही जागा रशियाच्या ताब्यात असल्याचे रशियाचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेने रशियाला पाठिंबा देऊन युक्रेनला सहकार्य करणे सोडले, तर अमेरिकेला त्या ठिकाणी खाणकामाचे अधिकार दिले जाऊ शकतात आणि रशिया स्वतः खाणकाम करून अमेरिकेला फायदा देऊ शकतो. ट्रम्प अध्यक्ष झाल्यापासून रशियाचा असा विश्वास आहे की आता या युद्धात त्यांचा वरचष्मा आहे. येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, 'ओव्हल हाऊस'मध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील चर्चेदरम्यान ट्रम्प यांनी वारंवार ते सध्या करार करण्याच्या स्थितीत नाहीत, या मुद्यावर जोर दिला. अमेरिकेतील घटनेवर भाष्य करण्याऐवजी पुतिन आता शांत राहून वारे कोणत्या दिशेने वाहतात, हे पाहतील. संपूर्ण जगातील माध्यमांसमोर अमेरिकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी झेलेन्स्की यांचा अपमान केला. झेलेन्स्की हे त्याच देशाचे अध्यक्ष आहेत, ज्यावर पुतिन यांनी तीन वर्षांपूर्वी हल्ला केला होता. हे युद्ध अजूनही चालू आहे. वॉशिंग्टनमध्ये झालेल्या या बैठकीवर आणि त्यादरम्यान झालेल्या जोरदार चर्चेवर पुतिन यांनी लगेचच कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही; मात्र काही रशियन अधिकाऱ्यांनी याबाबत भाष्य केले आहे. एकीकडे अमेरिका-युक्रेन संबंध बिघडण्याचा धोका आहे, तर दुसरीकडे अमेरिका-रशिया संबंधांच्या बाबतीत परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात बाचाबाची झाल्यानंतर युरोपियन महासंघाने मात्र युक्रेनला पाठिंबा जाहीर केला आणि झेलेन्स्की यांच्या समर्थनार्थ सोशल मीडियावर अनेक पोस्टदेखील केल्या. रशिया-युक्रेन युद्धातून अमेरिकेने माघार घेतल्यास युक्रेन वाचवण्याची जबाबदारी युरोपच्या खांद्यावर येईल. ट्रम्प यांनी कोणतेही युद्ध झाले, तर अमेरिका त्यापासून दूर राहील, असे स्पष्ट केले आहे. आता युक्रेन रशियाशी युद्ध करू शकणार नसेल, तर युरोपीय देश रशियाशी थेट युद्ध लढतील का, हा प्रश्न समोर उभा आहे. झेलेन्स्की यांना भेटण्यापूर्वी ट्रम्प यांनी युरोपचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आलेले ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टार्मर यांचीही भेट घेतली होती. ट्रम्प म्हणाले होते की, संपूर्ण युरोप रशियाशी युद्ध करणार आहे आणि युक्रेन त्याचा केंद्रबिंदू बनेल. यापूर्वी त्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांचीही भेट घेतली होती. अमेरिकेने युद्धातून माघार घेतल्यानंतर झेलेन्स्की एकटे पडले. अशा परिस्थितीमध्ये युरोपीय संघातील देशांना एकत्र यावे लागेल. यासाठी सर्वप्रथम त्यांना युक्रेनच्या सुरक्षेची हमी द्यावी लागेल. तथापि, रशियाने युक्रेनला सुरक्षेची हमी देण्यास सहमती दिल्यास युरोपियन देशांवर हल्ले केले जाण्याची शक्यता आहे. आता मोठा प्रश्न निर्माण होत आहे की एकट्या रशियाशी लढण्याची क्षमता युरोपमधील देशांमध्ये आहे का? याबाबत आकडे वेगळीच कथा सांगतात. रशिया युरोपियन महासंघातील देशांपेक्षा अनेक बाबतीत खूप पुढे आहे. युरोपियन महासंघाकडे १४ लाख नियमित सैनिक आहेत, तर रशियाकडे १५ लाख आहेत. युरोपियन महासंघाकडे १७ लाख राखीव सैनिक आहेत तर रशियाकडे २५ लाख राखीव सैनिक आहेत. अण्वस्त्रांच्या बाबतीत रशियाशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही.

युरोप आणि रशिया यांच्या क्षमता जगजाहीर असताना अमेरिका आणि रशियात संबंध पूर्ववत करण्यासाठी आणि संभाव्य आर्थिक सहकार्यावर चर्चा करण्यासाठी दोन्ही बाजूंच्या खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली. अध्यक्ष पुतिन यांनी अमेरिकेला दुर्मिळ खनिजे आणि ॲल्युमिनियम उत्पादनांशी संबंधित आकर्षक संयुक्त प्रकल्पांचे आमिष दाखवले आहे. अमेरिकेच्या युक्रेनबरोबरच्या संबंधांमध्ये बिघाडाचे परिणाम युक्रेनसाठी गंभीर असले, तरी रशियासाठी सकारात्मक ठरणार आहेत. अमेरिकेने युक्रेनला शस्त्रे देणे बंद केल्यास युक्रेनला रशियन सैन्याच्या हल्ल्यापासून स्वतःचे संरक्षण करणे कठीण होईल. युक्रेनला युरोपीय नेत्यांचा भक्कम पाठिंबा आहे; परंतु असे असूनही रशियन सैन्याने युक्रेनच्या अनेक भागांवर कब्जा केला आहे. युक्रेनशी सुरू असलेल्या युद्धात आपली बाजू वरचढ असल्याचा रशियाचा दावा आहे. 'ओव्हल ऑफिस'मध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात झालेल्या वादामुळे त्यांच्या या हटवादाला आणखी बळ मिळाले असल्यास आश्चर्य नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# आर्थिक विकासाचा दर वाढला!

देशाच्या आर्थिक विकास आघाडीवर काही सकारात्मक संकेत आहेत. भारत सरकारने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीत देशाचा जीडीपी म्हणजे सकल घरेलू उत्पादनाचा दर ६.२ टक्के झाला. त्यापूर्वीच्या तिमाहीत हा दर ५.६ टक्के होता.

आर्थिक आघाडीवर ही एक चांगली बाब मानली जात असली तरी वर्षभरापूर्वी हा दर ९.५ टक्के होता. म्हणजे वर्षभरापूर्वीच्या तुलनेत आजही हा दर कमी आहे. मात्र, ५.६ टक्के हा नीचांक आता मागे पडला असून, जीडीपीने ६.२ टक्के हा आकडा गाठला आहे.

जीएसटीचे संकलन, वीज उत्पादन, सरकारी खर्चात झालेली वाढ या मानकांवरून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

**निर्यात वाढ** : २०२४ च्या शेवटच्या तिमाहीत निर्यात १०.४ टक्क्यांनी वाढली. त्यापूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ ३ टक्के अधिक आहे. आयात १.१ टक्के घटली. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरला असल्याने ही घट झाली असावी असे तज्ज्ञांना वाटते. मात्र सरकारला चिंता वाटावी अशी बाब म्हणजे विदेशी गुंतवणुकीत झालेली घट.

जीडीपी वाढण्याचा दर आगामी काळातही कायम राहील व तो ७.५ टक्के यावर पोहोचेल असे सरकारला वाटत आहे.

**दास यांची नियुक्ती** : रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर शक्तिकांता दास यांना पंतप्रधानांचे मुख्य सचिव नियुक्त करण्यात आले आहे. सरकारमध्ये महत्त्वाची कामगिरी मिळणारे ते दुसरे गव्हर्नर असतील. यापूर्वी डॉ. मनमोहनसिंग यांना प्रथम अर्थमंत्री व नंतर देशाचे पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. या पृष्ठभूमीवर दास यांच्या नियुक्तीला महत्त्वाचे मानले जात आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठीच त्यांची ही नियुक्त करण्यात आल्याचे मानले जाते. दास यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून देशाची अर्थव्यवस्था सांभाळण्यात यशस्वी भूमिका बजावली आहे. आता त्यांना अधिक मोठी भूमिका बजावण्याची संधी देण्यात आली आहे. अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती, घसरता रुपया व डोनाल्ड ट्रम्प यांच्या काही निर्णयांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा संभाव्य परिणाम हे सारे हाताळण्याची कामगिरी दास यांना पार पाडावी लागणार आहे. यातही रुपया सावरण्यासाठी ठोस उपाययोजना दास यांच्याकडून अपेक्षित आहे. डॉलर ९० रुपयापर्यंत जाऊ नये असे सरकारला वाटते. मात्र तो आताच ८८ रुपयांच्या उंबरठ्यावर आहे. रुपयाची ही घसरण रोखण्यासाठी दास हे सरकारला मार्गदर्शन करतील असे समजते.

**शेअर बाजार** : मागील काही काळापासून शेअर बाजारात बरीच उलथापालथ होत आहे. अमेरिकेत घडणाऱ्या घटनांचा परिणाम भारताच्या शेअर बाजारावर होणे अपरिहार्य असल्याचे मानले जाते. शेअर बाजारात स्थिरता आणण्यासाठीही दास यांच्याकडून काही उपाययोजना अपेक्षित आहेत.

**केजरीवाल राज्यसभेत?** : दिल्लीचे मुख्यमंत्रिपद व आमदारकी- दोन्ही गमावल्यानंतर आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल राज्यसभेचा दरवाजा ठोठावतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, ती आता खरी ठरण्याचे संकेत आहेत. पंजाबमधील आपच्या एका आमदाराचे निधन झाल्याने लुधियाना पश्चिम मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे आणि त्यासाठी आपने आपले राज्यसभा खासदार संजीव अरोरा यांची उमेदवारी घोषित केली आहे. अरोरा निवडून आल्यानंतर त्यांना मंत्री केले जाईल व त्यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागी केजरीवाल यांना पाठविले जाईल असे समजते. पंजाबमधून आपचे सात खासदार राज्यसभेवर निवडून गेले आहेत व केजरीवाल यांच्यासाठी कोणताही खासदार आपली जागा रिक्त करण्यात तयार असेल असे सूचक विधान अरोरा यांनी केले आहे. याचा अर्थ अरोरा यांनी स्वत: याच कारणासाठी राज्यसभा सोडण्याचा निर्णय घेतला असे मानले जाते. अरोरा २०२२ मध्ये राज्यसभेवर निवडून गेले होते. त्यांचा कार्यकाळ २०२८ पर्यंत होता. याचा अर्थ केजरीवाल यांनी २०२८ पर्यंतची तरी आपली सोय केली आहे. मात्र मधल्या काळात होणाऱ्या राज्यसभा द्विवार्षिक निवडणुकीत ते पुन्हा सहा वर्षांसाठी राज्यसभेवर जातील असा कयास आम आदमी पक्षात नोंदविला जात आहे.




**राज्यसभेतही गरळ?** : केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत सारी मर्यादा-शालीनता बाजूला ठेवीत पंतप्रधानांच्या विरोधात जे गरळ ओकणे सुरू केले होते, तेच ते राज्यसभेत करतील असे मानले जाते. केजरीवाल यांची एकूणच भाषा असभ्य मानली जाते. दिल्ली विधानसभेत त्यांच्या भाषणांना मर्यादित प्रसिद्धी मिळत होती, ते राज्यसभेत आल्यावर काय काय होणार याचा केवळ कयास व्यक्त केला जात आहे. मधल्या काळात आपचे राज्यसभा खासदार फुटणार अशी चर्चा केली जात आहे. केजरीवाल राज्यसभेत येताच त्यांच्या पक्षाचे काही खासदार वेगळा गट स्थापन करू शकतात. केजरीवाल यांचे एक नातेवाईक व राज्यसभा खासदार स्वाती मालिवाल यांनी यापूर्वीच केजरीवाल यांच्या विरोधात आघाडी उघडली आहे. केजरीवाल यांचे समर्थक व विश्वासू राघव चड्ढा हेही केजरीवाल यांच्या कार्यशैलीवर नाराज असून त्यांचे विदेशातील वाढते वास्तव्य पाहता ते अनिवासी भारतीय तर झाले नाहीत ना असा प्रश्न आम आदमी पक्षातच विचारला जात आहे. केवळ मालिवाल वा चड्ढाच नाही तर आणखी काही खासदार केजरीवाल यांच्या विरोधात बंडखोरी करू शकतात असे मानले जाते. केजरीवाल राज्यसभेत जाण्यापूर्वी राज्यसभेतील त्यांचे खासदार फुटतात की नंतर एवढाच काय तो प्रश्न बाकी असल्याचे आप नेत्यांना वाटते.

**आमदारही फुटणार?** : दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे २२ आमदार निवडून आले आहेत. यातील ६ ते ८ आमदार फुटण्याची शक्यता आहे. केजरीवाल व आम आदमी पक्षाला आता कोणतेही भवितव्य नसल्याची भावना या पक्षात तयार होत आहे आणि त्याचा हा परिणाम असण्याची शक्यता आहे.

**कायदेशीर अडचणी** : केजरीवाल यांच्यासमोर केवळ राजकीय आव्हान नाही तर त्यांच्या कायदेशीर अडचणीही वाढण्याची शक्यता आहे. केजरीवाल मुख्यमंत्री असताना देशातील नामवंत वकील त्यांची बाजू मांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात उभे राहात होते. आता ते चित्रही दिसणार नाही असे काही नेत्यांना वाटते.

**काँग्रेससोबत राहणार?** : दिल्ली निवडणुकीत काँग्रेसशी समझोता न झाल्याने १२ मतदारसंघात आपचे उमेदवार पराभूत झाले. दिल्लीत काँग्रेस व आप एकत्र लढले असते तर कदाचित दिल्लीचे निकाल वेगळे राहिले असते. दिल्लीत स्वबळावर लढण्याचा निर्णय केजरीवाल यांनी स्वत:च घेतला होता. दिल्लीत त्यांना स्वबळाची प्रचीती आली. त्यामुळे या पराभवासाठी त्यांना काँग्रेसला जबाबदार ठरविता आले नाही. त्याचप्रमाणे येणाऱ्या काळात आपण स्वबळावर लढू शकत नाही याची कल्पना केजरीवाल यांनाही आली आहे. त्यामुळे त्यांनी काँग्रेसवर टीका केलेली नाही. अन्यथा त्यांनी काँग्रेसवर तोफा डागणे सुरू केले असते.

केजरीवाल यांच्यासमोर आपले राजकीय अस्तित्व टिकविण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे राज्यसभेत जाणे. त्यांनी सध्या तरी हा मार्ग निवडण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह. अशा सभागृहात केजरीवाल आरोपांच्या फैरी झाडताना कनिष्ठतेची कोणती पातळी गाठतात हे दिसणार आहे.

## वेध

हेमंत सालोडकर

# नागपुरातील ऑटोचालकांचा अभिनव स्वयंशिस्त उपक्रम

जसा राजा तशी प्रजा असते असे म्हणतात. आपले लोकप्रतिनिधी कसे आहेत, यावरून लोकांची, समाजाची वागणूक ठरते. लोकप्रतिनिधी कसे आहेत, ते किती जागरूक आहेत तसाच विचार समाज, संस्था करतात. प्रत्येक काम सरकार करेल ही प्रवृत्ती पूर्वी होती. पण मागील काही काळापासून समाजात सकारात्मक बदल दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे आपले राज्यकर्ते कसे आहेत याचाही विचार लोक करतात. राज्यकर्ते नाकर्ते असले म्हणजे लोक कोणतीही गोष्ट फार गांभीर्याने घेत नाहीत. राज्यकर्तेच निष्क्रिय आहेत, मग मला काय करायचे या विचाराने ते वागत असतात. पण मागील दहा वर्षांपासून केंद्रात आणि तीन वर्षांपासून राज्यात महायुतीचे सरकार असताना समाजात, प्रशासकीय रचनेत लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक लोकहिताचे काम सरकार करेल, अशी प्रवृत्ती पहिले दिसत होती. पण आपले लोकप्रतिनिधी लोकहिताची कामे करत असताना सामाजिक संघटना, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक संघटना पुढाकार घेत असून, विविध उपक्रम राबवून सरकारचा ताण कमी करीत आहे. त्यातलाच एक उपक्रम म्हणजे वाहतूक पोलिसांचा ताण कमी व्हावा आणि स्वयंशासन म्हणून नागपुरातील ऑटोचालकांनी आमचे शहर, आमचा ऑटोरिक्षा, सुरक्षेची जबाबदारीही आमचीच हा होय. साधारणत: अत्यंत बेशिस्त वाहनचालक म्हणून ऑटोरिक्षाचालकांची सर्वत्र ओळख आहे. ग्राहकांशी वाद घालणे, मुजोरी करणे, आवश्यकतेपेक्षा अधिक प्रवासी भरणे, रस्त्यावर बेफाम ऑटो चालवणे, नियमांचे सर्रास उल्लंघन करणे अशा घटना वारंवार करणे आणि आमचेच खरे या आविर्भावात वावरणारे म्हणजे ऑटोचालक अशी त्यांची ओळख.



पण ही ओळख पुसण्यासाठी आणि समाजातील स्वत:ची प्रतिमा सुधारण्यासाठी ऑटोचालकांनीच पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत आपण बेछूट वागलो याची जाणीव त्यांना झाली आणि स्वयंशिस्तीसाठी त्यांनी स्वत:च पुढाकार घेतला हे बरे झाले. नागपुरातील ऑटोरिक्षा चालक संघटनेने ऑटोचालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी त्यांनी पत्रकेही वाटली. पहिल्याच दिवशी या उपक्रमाला चालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पण शिस्त किती दिवस टिकेल हाही प्रश्नच आहे. कारण पैसे कमावण्याच्या नादात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरणे, बेफाम ऑटो चालवणे, रस्त्यावरच्या पायी चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला 'कुठे चलायचं आहे' असे विचारणारे, त्यामुळे मागून येणाऱ्याचा अपघात होईल, याची किंचितही तमा न बाळगणारे, आपल्या व्यवसायाशी स्पर्धा नको असलेले ऑटोचालक आता शिस्तीसाठी प्रत्येक चौकात तीन तास देणार आहेत.

ऑटोचालकांमध्ये बदल झाल्यास अपघातांची संख्या निश्चितच कमी होईल. त्यामुळे ऑटोचालक आणि इतरही लोक सुरक्षित राहतील. खरे तर ही जाणीव यापूर्वीच होणे गरजेचे होते. समाजातील प्रत्येक घटक शिस्तीने वागला तर अपघातच होणार नाहीत. पण हल्ली रॉंग साईड तेही बेफाम वाहन चालवणे ही नित्याचीच बाब झाली आहे. ऑटोचालकांविषयी तर बोलायलाच नको. त्यांना काही म्हटले तर तेच हमरीतुमरीवर येतात. कायद्याचा धाक नाही. एका ऑटोचालकाशी वाद घातला तर इतरही अंगावर येतात. मग कोण त्यांच्याशी वाद घालणार असे म्हणून लोक मुकाट्याने पुढे जातात. याचाच फायदा ऑटोचालक घेतात आणि कसेही वागतात. संपूर्ण रस्ता आमचाच आहे, या आविर्भावात ते असतात. वाहतुकीचे आम्ही पालन करणार नाही अशी त्यांनी प्रतिज्ञा केली असते. पोलिसही त्यांना अडवत नाही म्हणून आम्हीच रस्त्यावरचे राजे आहोत, अशी ऑटोचालकांची वागणूक असते. इतरांशी आपण स्पर्धा करायची नाही आणि इतर कोणी आपल्याशी करीत असेल तर त्यांची अडवणूक करायची, इतर कोणी चांगली सेवा देणाऱ्यांचा विरोध करायचा अशी संकुचित प्रवृत्ती बळावल्यामुळेच ऑटोचालकांविषयी समाजात एकप्रकारचा नकारात्मक भाव निर्माण झाला आहे. हा नकारात्मक भाव मिटविण्यासाठी ऑटोचालकांमधीलच काही सुज्ञ लोक समोर आले हे चांगले झाले. सोनारानेच कान टोचल्यामुळे त्यांच्यात बदल घडेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्यांचा उपक्रम फलदायी ठरो, त्यांच्यात सकारात्मक बदल होवो, त्यांच्यात आत्मचिंतनाची प्रक्रिया अशीच सुरू राहावी, त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य चांगले राहील, अशी अपेक्षा आहे.

९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# निकोप दृष्टिकोन हवा

नुकताच जागतिक महिला दिवस सर्वत्र साजरा करण्यात आला. अनादी काळापासून भारताला कर्तृत्ववान महिलांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे.

प्राचीन काळापासून महान विदुषी गार्गी, याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी मैत्रेयी, रामायणामध्ये ज्यांचा विशेष उल्लेख आला आहे अशा राम पत्नी सीता, वालीची पत्नी तारा आणि रावणाची पत्नी मंदोदरी, त्याचप्रमाणे महाभारतामध्ये ज्यांचा विशेष उल्लेख आला आहे अशी द्रौपदी, आपल्या पुत्रांना म्हणजे पांडवांना योग्य उपदेश करणारी कुंती, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणारी जिजामाता, राणी चन्नम्मा राणी दुर्गावती, 'मेरी झांसी नहीं दूंगी' म्हणणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, कुशल प्रशासक अहल्यादेवी होळकर, आझाद हिंद फौजेमध्ये महिलांचे नेतृत्व करणाऱ्या कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये आपले योगदान देणाऱ्या प्रीतिलता वड्डेदार, शांती घोष, दुर्गा भाभी आणि भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारताचे नेतृत्व करणाऱ्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, सुषमा स्वराज आणि आता सद्य:स्थितीत भारताचा आर्थिक डोलारा सांभाळणाऱ्या निर्मला सीतारामन्? अशी कितीतरी नावे घेता येतील. पतीला भारतीय सैन्यामध्ये लढताना वीरमरण आलेले असताना स्वतः भारतीय सैन्याचे कठोर प्रशिक्षण घेऊन सैन्यामध्ये प्रवेश करणाऱ्या अनेक रणरागिणी सुद्धा आहेत. कोरोनाच्या काळामध्ये पतीचे निधन झाल्यानंतर आपल्या कुटुंबाचा डोलारा सांभाळणाऱ्या अनेक सावित्री सुद्धा समाजामध्ये आहेत. नोकरी आणि घर अशी तारेवरची कसरत करून आपल्या जबाबदारींना न्याय देणाऱ्या सुद्धा लाखो महिला आहेत. अशा सर्वांच्या कर्तृत्वाला प्रणामच केला पाहिजे.

असे असताना सुद्धा भारतामध्ये कम्युनिस्टांची वर्गसंघर्षाची नीती अमलात आणणारे अनेक गट स्त्री विरुद्ध पुरुष असा संघर्ष निर्माण करताना आपल्याला दिसतात. वृत्तपत्रांतून, समाज माध्यमांतून असे अनेक भरकटलेले विचारवंत हा संघर्ष जोपासताना दिसतात. स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांना अतिरंजक स्वरूप देऊन संपूर्ण पुरुष समाजालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे लोक सुद्धा आहेत. यावेळेस याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले जाते की करोडो लोकांच्या पुरुष समाजामध्ये असे अत्याचार करणारे केवळ काहीच आहेत. अत्याचार करणाऱ्या लोकांना चौकामध्ये बदडणारे सुद्धा पुरुषच असतात. प्राचीन काळामध्ये एका सीतेसाठी रामायण झालेले आहे. एका द्रौपदीसाठी महाभारत घडलेले आहे. परंतु असे असताना सुद्धा काही लोकांना आपल्या पत्नीसाठी रावणाच्या विशालकाय सैन्याशी लढा देणारा व रावणासारख्या बलाढ्य शत्रूला यमसदनी पाठविणारा राम प्रेरक वाटत नाही तर त्यांना सीतेला स्पर्श न करणारा रावण विनयशील वाटतो. समाज माध्यमांवर, काही ठिकाणी वृत्तपत्रांमध्ये सुद्धा अशा पद्धतीचे लेख वाचण्यात येतात. त्यावेळेस हे सर्व लोक समाजाला भ्रमिष्ट करण्याचा प्रयत्न करणारे आहेत, समाजासमोर खोटे आदर्श प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे आहेत, खलनायकांना नायक सिद्ध करण्याचा खटाटोप करणारे आहेत असे वाटते.

रावणाने सीतेला स्पर्श का केला नाही याचे कारण रावणाने स्वतःच युद्धकांडामध्ये दिलेले आहे. त्यात तो म्हणतो की, फार पूर्वी पुंजीकस्थला नावाची एक अप्सरा होती. ती माझ्या भयाने लपून-छपून जात असताना मी तिला पकडले व तिच्या इच्छेविरुद्ध वर्तन केले यामुळे ब्रह्मदेवाने मला शाप दिला. यापुढे जर मी कुठल्याही स्त्रीचा तिच्या इच्छेविरुद्ध उपभोग घेतला असता माझ्या डोक्याचे शंभर तुकडे होतील. त्याचप्रमाणे कुशध्वज नावाच्या ऋषींची मुलगी वेदवती ही विष्णूसाठी तपश्चर्या करीत असताना रावणाने तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला असता तिने सुद्धा रावणाला शाप दिला ती कुठल्याही स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तू बळजबरी करण्याचा प्रयत्न केलास तर तू अग्नीमध्ये भस्म होशील. रावणाने नलकुबेराची पत्नी रंभा हिच्यावर सुद्धा अतिप्रसंग केला होता. त्यावेळेस नलकुबेराने त्याला शाप दिला की, तू कुठल्याही स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी बळजबरी केल्यास तुझ्या मस्तकाचे तुकडे होऊन तू मरण पावशील. असे सर्व दाखले रामायणामध्ये आलेले आहेत.

पूर्वी अशा पद्धतीचा शाप म्हणजे त्या व्यक्तीवर घातले गेलेले बंधन असे. आता असे बंधन कायद्याचे आहे. कायदे कठोर असणे व त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. आपल्या समाजामध्ये कायदा व त्याची अंमलबजावणी याच्यामध्ये बरेचदा तफावत आढळते. अनेकदा गुन्हेगार पुराव्याअभावी सुटतात. महिला अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये अनेक वेळा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा अभाव, पोलिसांकडून प्रभावीपणे न झालेला तपास, न्यायालयांमध्ये वर्षानुवर्ष चालणारे खटले यामुळे सुद्धा न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये वेळ लागत असतो. काळ थांबत नाही. एखाद्या अल्पवयीन किंवा तरुण मुलीवर झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये पीडितेचे वय वाढत असते. त्यांचे लग्न, सांसारिक जबाबदाऱ्या या सर्व प्रकरणांमध्ये त्यांची मानसिकता गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी कायम राहणे हेही महत्त्वाचे असते.

धर्ममध्ये प्रकृती, विकृती आणि संस्कृती सांगितली गेलेली आहे. माझ्याजवळ एक पोळी आहे. मला भूक लागलेली आहे. अशा वेळेस मी एक पोळी खाणे ही प्रकृती आहे. त्याच वेळेस कोणी भुकेला माणूस आल्यास त्याला त्यातली अर्धी पोळी देणे ही संस्कृती आहे व मला आणखी एक पोळी पाहिजे म्हणून दुसऱ्या जवळची एक पोळी हिसकावून घेणे ही विकृती आहे. काही वर्षांपूर्वी दिल्लीमध्ये झालेले निर्भया कांड ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना होती. समाजामध्ये सर्व स्तरातून याचा निषेध करण्यात आला. महिलांबरोबरच पुरुषही याच्या विरोधात रस्त्यावर उतरले होते. काही वर्षांपूर्वी हैदराबाद येथे डॉक्टर प्रियांका रेड्डी या तरुणीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला होता. त्याही वेळेस समाज क्षुब्ध झाला होता. पोलिसांनी असे करणाऱ्या आरोपींना गोळ्या घातल्या. त्यानंतर तेथे जमलेल्या समाजाने असे करणाऱ्या पोलिसांवर पुष्पवृष्टी केली होती. स्त्री विरुद्ध पुरुष अशा पद्धतीचा संघर्ष निर्माण करणे ही भारतीय संस्कृती नाही. महिला सक्षमीकरणासाठी, महिलांना अधिकाधिक संधी मिळण्यासाठी, स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटना थांबविण्यासाठी पुरुषांची अधिकाधिक मदत घेणे त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालयांमधून सुद्धा विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे व त्यांना चांगल्या कामांमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. समाजाच्या भल्यासाठी स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना पूरकच असले पाहिजे, विरोधी नव्हे. महिला दिनाच्या निमित्ताने याही पैलूचा विचार होणे आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### शापित क्रिकेटपटू

प्रत्येक खेळाडूची आपल्याला देशाकडून खेळायला मिळावे हीच एकमेव इच्छा असते. त्याकरिता तो खूप परिश्रम करतो. पद्माकर शिवलकर यांच्या नशिबात मात्र तो योग कधीही आला नाही. इतका उत्कृष्ट डावखुरा फिरकी गोलंदाज असूनही बिसेनसिंग बेदी, चंद्रशेखर, प्रसन्ना त्याच काळात भारतीय क्रिकेट संघात असल्याने भारतीय संघाकडून एकही कसोटी खेळू शकला नाही याचे खूप वाईट वाटते. पद्माकर शिवलकर यांना संधी मिळाली असती तर त्यांनी त्याचे सोने केले असते. देशांतर्गत झालेल्या सर्व क्रिकेट सामन्यांत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती. बेदी व ते दोघेही समकालीन डावखुरे फिरकी गोलंदाज होते. एक काळ असा होता की भारतीय क्रिकेट संघात अर्ध्यापेक्षा जास्त खेळाडू हे मुंबईचे असायचे, पण शिवलकर यांना कधीही संधी मिळाली नाही. आता क्रिकेट सामने ५ दिवसीय कसोटी बरोबरच ५०-५०, २०-२० षटकांचे खेळले जातात. त्यांच्या वेळी ते असते तर त्यांना भारताकडून खेळण्याची संधी मिळाली असती. नकतेच या शापित क्रिकेटपटने या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

**मोहन पांडे**/नागपूर

### होळी पारंपरिक सण

होळी म्हणजे शिमगा या सणाला हिंदू धर्मातील इतर सणांप्रमाणे अत्यंत महत्त्व आहे. हा सण फाल्गुन महिन्यात येत असून साधारणपणे तो पाच दिवस साजरा केला जातो. विविध प्रकारच्या हिंदू संस्कृतीने नटलेल्या संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या काही भागांमध्ये हा सण मोठ्या उत्साहाने दरवर्षी साजरा करण्यात येतो. या सणाला रंग, प्रेम आणि वसंत ऋतूतला अत्यंत महत्त्वाचा सण म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे. या सणाचे महत्त्व म्हणजे राधा आणि कृष्ण या देवतांचे शाश्वत आणि दैवी प्रेम साजरे करणे होय. याशिवाय होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतू कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. होळी हा रंगाचा सण असल्या कारणाने या सणाला होलिकोत्सव. होलिका दहन याशिवाय इतर अनेक नावे आहेत.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळली जातात आणि पेटलेल्या होळीभोवती बोंबा मारत लोकप्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात हिंदू धर्मातील लोक होळीच्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात व होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन साजरी करतात. तसेच होळीनंतर पाच दिवसांनी रंगपंचमी साजरी केली जाते. धूलिवंदनाला धूळवड देखील म्हटले जाते. त्या दिवशी होळीची राख अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळत घेतली जाते. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांना एकत्र आणणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पाहिले जाते. कोकणात तर हा सण अतिशय मोठा सण म्हणून साजरा केला जातो. प्रामुख्याने होळी सणाला गाणी सुद्धा म्हटली जातात. आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष हा दिवस गलाल उधळून, टीमक्या ढोल वाजून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. या दिवशी लोक भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश करतात. होळीच्या सणाची परंपरा ही १२ व्या शतकापासून सुरू असल्याचे दिसून येते.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

### तिन्ही सांजेला दिवा लावण्याचे महत्त्व!

सूर्यास्ताच्या वेळी वातावरणात बदल होतात. या काळात मोठ्या प्रमाणात ऊर्जेची गरज असते. यावेळी वातावरणातील नकारात्मक शक्तींचे प्राबल्य कमी करण्यासाठी आणि जीवजंतूंची वाढ नियंत्रित करण्यासाठी प्रकाशाची आवश्यकता असते. म्हणून दिवे लावावे. इलेक्ट्रीक दिव्यांपेक्षा तेल किंवा तुपाच्या दिव्यांच्या लहरी प्रभावी ठरतात. दिवा लावण्याचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे.

सायंकाळी देवाजवळ आणि तळशीजवळ दिवा लावावा. दिव्याच्या वातीवरील काजळी रोज काढून टाकावी. शक्य असल्यास देवासमोर २४ तास (अखंड) दिवा तेवत ठेवावा. तिन्ही सांजेच्या वेळी दिवा लावण्याचे अनेक लाभ आहेत. त्यामुळे घराभोवती सात्त्विक लहरींचे संरक्षक कवच निर्माण होते. तसेच नकारात्मक शक्तींच्या प्रभावापासून संरक्षण मिळते. अपघात, नकारात्मक घटना, भीती व त्रास कमी होतो. बदलत्या ऋतूनुसार सूर्यास्तानंतर देवघरात आणि तुळशीपाशी दिवा लावावा. पहाटे अंघोळ करून देवघरात दिवा लावावा.

दिवा म्हणजे प्रकाशाची पूजा, जो देवतांचा प्रतीकात्मक स्वरूप आहे. त्यामुळे सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर दिवा लावणे आवश्यक आहे. तिन्ही सांजेच्या वेळी घरात राहून पूजा, शुभम करोति, स्तोत्रपठन आणि नामजप करावा.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची साफसफाई व स्वच्छतेबाबत विशेष लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही व्हिडिओने विचलित न होता नागरिकांनी नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयावरील आपला विश्वास कायम ठेवावा. गरीब, गरजू लोकांसाठी दर्जेदार ईलाजाचे केंद्र म्हणून पुढेही हे रुग्णालय काम करेल, अशी ग्वाही डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाताने दिली आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या रुग्णालयातील बालरोग अतिदक्षता विभाग कक्ष ७ मध्ये झुरळ असल्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्याच्या संदर्भात डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी खुलासा केला आहे.

जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणाऱ्या व जनतेच्या इलाजासाठी सर्वात हक्काचे स्थान असणाऱ्या रुग्णालयाच्या संदर्भात शासन संवेदनशील असून या संदर्भातील चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी रुग्णालय प्रशासनामार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली असून याबाबत सखोल चौकशी सुरु आहे. रुग्णालयाच्या साफसफाई व स्वच्छतेबाबत वेळोवेळी उपाययोजना करुन विशेष लक्ष दिले जाते.

रुग्णालयातील झुरळ व इतर कीटक होऊ नयेत यासाठी रुग्णालय प्रशासनामार्फत नियमितपणे बायोक्लिन पेस्ट कंट्रोल, बार्शी रोड, लातूर या कंपनीकडून पेस्ट कंट्रोलचे कामकाज केले जाते. संबंधित कंपनीला पुनश्च पेस्ट कंट्रोल करण्याच्या सूचनेनुसार संबंधित कंपनीने संपूर्ण रुग्णालयामध्ये पुनश्च पेस्ट कंट्रोल काजकाज केले जात आहे. या संस्थेतील शैक्षणिक तसेच रुग्णसेवेवर कुठलाही परिणाम पडलेला नसून रुग्णसेवा उत्तम व सुरळीतपणे चालू असल्याचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी दिली आहे.

# आ. प्रताप चिखलीकर यांना मंत्रिपद द्यावे

## अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख साबेर यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर ,दि. १० मार्च-**

विधानसभा निवडणुकीत विक्रमी मताधिक्य मिळवत राष्ट्रवादीचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे निवडून आले. माजी खासदार दुरदृष्टी असलेला अनुभवी नेता आमदार म्हणून त्यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश करावा, अशी मागणी अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष (अजित पवार गट) शेख साबेर करीत आहेत. नांदेडकरांना मंत्रिपदाची आशा लागली आहे.



नांदेड जिल्ह्यात सर्व ९ जागांवर महायुतीचेच आमदार असून त्यांत भाजपाचे ५, शिवसेनेचे ३ तर राष्ट्रवादीकडून चिखलीकर हे एकमेव आमदार आहेत. मागील दोन दशकांत वेगवेगळ्या कालखंडात दोनदा आमदार झालेल्या चिखलीकर यांची आमदारकीची तिसरी टर्म असून खासदारकीचा ही पाच वर्षाचा अनुभव या मोठ्या अनुभवाच्या जोरावर पक्ष विस्ताराच्या त्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी व नांदेड जिल्ह्यात भाजपाला आव्हान द्यायचे असेल, तर चिखलीकरांना सत्तापद देण्याची गरज आहे. आमदार प्रताप पाटील चिखलीकर सर्वांना बरोबर घेऊन काम करणारा नेता असल्याने, प्रदीर्घ अनुभवाच्या शिदोरीवर त्यांना मंत्रिपदाची संधी देण्याची मागणी राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख साबेर शेख सगीर यांच्यासह मतदारसंघातील पदाधिकारी करीत आहे.

# सत्ता व मालमत्ता पेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ : बालाजी पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १० मार्च-**

वडिलोपार्जित मालमत्ता आणि त्या आधारावर सत्ता मिळवता येते पण गुणवत्ताही स्वतःलाच निर्माण करावी लागते.असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक कवी बालाजी पेटेकर खतगांवकर यांनी केले. ते सिंधू कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अँड सायन्स महाविद्यालयाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन निरोप समारंभ, बक्षीस वितरण आणि महिला दिन अशा त्रिवेणी संगमाच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीं महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सहसचिव अशोक दाचावर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते बालाजी पेटेकर यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये संतती कशी घडवावी यापेक्षा संपती कशी मिळवावी याची स्पर्धा लागली.पण ज्ञानाच्य जोरावर सर्व क्षेत्र काबीज करता येतात. आपल्यातली गुणवत्ता ओळखून ते सिद्ध करण्यासाठीची जिद्द आपल्यात असणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते बोलत होते. त्यांनी आररं ...आररं ...बापू पाहिजे का सुख खंडीभर ...डोकं ठेवून झोपून बघ एकदा माईच्या मांडीवर... ही कविता सादर करत आईच्या माडीवर डोकं ठेवल्यानंतर येणारी झोप ही जगातल्या कोणत्याही सुखापेक्षा श्रेष्ठ आहे असे विशद केले. त्यानंतर त्यांनी सखी तुझ्या संग,आम्हीही प्रेम केलो होतो, मैत्रिणीच्या लग्नात, या टीव्ही मोबाईल मुळे अशा कवितांनी विद्यार्थ्यांना अंतर्मुख व्हायला लावण्याबरोबरच हसून हसून त्यांना एका वेगळ्याच



भाव विश्वास घेऊन गेले.कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्ञानमाता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रजलित करून स्वप्ना गुनावार यांच्या वंदे मातरम या सुमधुर गीताने सुरुवात झाली.यावेळी उपप्राचार्य मिलिंद राजूरकर, प्रा.अनुराधा गंधारे, बोनंतापल्ले, सौ.मनीषा , स्वप्ना गुनावार, प्रा. भिमराव दिपके, प्रा. विश्वनाथ भालेराव, महाजन, विद्यार्थी प्रतिनिधी कपिल पाटील वैष्णवी झाडे, शंकर हिवराळे, नीता केरले, गिरी, कळसकर व सर्व महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रमुख वक्ते बालाजी पेटेकर खतगांवकर यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव सर यांनी केले. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन आणि आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख अभिनंदन सीताफुले यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.मिलिंद वाघमारे यांनी केले तर आभार मिलिंद राजूरकर यांनी मानले.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### दहा वर्षीय आवेज आयुब शेखचा पहिला रोजा



**मुखेड** -मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असलेला रमजान महिना सुरु असुन रविवार दि. ९ मार्च रोजी शहरातील व्यंकटेश नगर येथील ५वी वर्गात शिकणारा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा-उपवास ठेवला. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवतात. मन व शरीर शुद्ध करण्याचा तो एक मार्ग असल्यामुळे मुस्लिम धर्मात रोजाला विशेष महत्त्व आहे. सध्या मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता वाढली आहे. मुखेड शहरातील शेख आयुब यांचा १० वर्षाचा मुलगा आवेज आयुब शेख याने आपल्या आयुष्यातील रमजानचा पहिला रोजा उपवास ठेवल्याने त्याच्या सर्वत्र स्तरांतून कौतुक होत आहे.

### जिजाऊ विद्या संकुलात शिव जन्मोत्सव सोहळा



**नायगाव-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती येथून जवळच आसलेल्या खंडगाव (बेंद्री) ता.नायगांव येथील जिजाऊ विद्या संकुलात काल शनिवारी जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शिवव्याख्याते तानाजी महाराज वासरीकर यांचे व्याख्यान झाले. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बाबुराव पाटील शिंदे हे होते तर प्रमुखअतिथी म्हणून दिगांबर पा.कदम , पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, शिव सेनेचे तालुका प्रमुख रविंद्र भिलवंडे, सरपंच आनंदराव डुमणे, नागनाथ अनंतवाड, संचालक भास्कर पा.शिंदे, राजू पा.शिंदे, सुरज कदम आदींची उपस्थीती होती. प्रारंभी सकाळी दहा वाजता ढोल ताशाच्या निनादात महाविद्यालय परिसरात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली असून यावेळी जिजाऊ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थीनी, प्राध्यापक, प्राध्यापिका यांनी मराठमोळा पेहराव परिधान करून या शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये स्वंयस्फुर्तपणे सहभाग नोंदवला असल्याचे दिसून आले . हा शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य बाबू आनमुलवाड यांसह विद्यार्थीनी मोलाचे परीश्रम घेतले .

### युवा उद्योजक श्रीनिवास नेम्मानिवार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा


**किनवट-**किनवट शहरातील युवा उद्योजक तथा भारतीय जनता पक्षाचे तरुण तडफदार युवा कार्यकर्ते श्रीनिवास नेम्मानीवार ( क्वालिटी सिनू)यांचा वाढदिवस किनवट शहरात उत्साहात साजरा करण्यात आला असून यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्यावतीने भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांना भव्य पुष्पहार घालून तसेच केक कापून अभिष्टचिंतन केले आहे श्रीनिवास नेम्मानिवार हे युवा उद्योजक म्हणून सर्वत्र परिचित आहेत.प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासत श्रीनिवास नेम्मानिवार यांनी किनवट माहूर तालुक्यात एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक प्राप्त केला. धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. सर्वसामान्य, गोरगरीब लोकांच्या सुखदुःखात धावून जाणारे ते एक उभरत नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत अशा अशा भावना स्वागत आयनेणीवार यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केल्या आहेत. वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आशिष नेम्मानीवार,संतोष दासरवार,व्यंकट माडपेलिवार,सागर नेम्मानीवार,सतीश नेम्मानीवार,संतोष माडपेलीवार यांच्यासह श्रीनिवास नेम्मानिवार यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कापूस विक्रिसाठी सि.सि.आयकडे नोंदः सूर्यवंशी

**भोकर-** भारतीय कापूस निगम सि.सि.आय.हंगाम २०२४-२०२५ मध्ये किमान हमीदराचा लाभ मिळवण्याकरिता सर्व शेतकऱ्यांनी दि.१५ मार्च पर्यंत सि.सि.आय.कडे नोंदणी करण्यात यावी त्यानंतर आलेल्या शेतकऱ्यांचे कापूस विक्रिसाठी नोंदणी केली जाणार नसल्याचे बाजार समितीचे सचिव सूर्यवंशी यांनी सांगीतले. कापूस उत्पादक शेतकरी आपल्याकडे असलेला कापूस भारतीय कापूस निगम सि.सि.आय.कडे हमीदराचा भाव मिळविण्यासाठी दि.१५ मार्च पर्यंत नोंदणी करावी त्यानंतर आलेले शेतकरी कापूस विक्रिसाठी नोंदणी करु शकणार नाहीत.त्यामूळे ठरवून दिलेल्या दिनांकापर्यंत आपली कापसाची विक्रिसाठी नोंद सि.सि.आय.कडे करण्यात यावी असे अवाहन बाजार समितीचे सचीव सूर्यवंशी यांनी केले आहे.

# आठ वर्षीय इशरतचा पहिला रोजा पूर्ण



**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. १० मार्च-**

येथील युवा कवी,गीतकार जाफर आदमपूरकर यांची भाची व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुखेड आगारातील वाहक शेख शब्बीर शहाहुसेन यांची आठ वर्षीय मुलगी शेख इशरत हिचा आपल्या जीवनातील पहिला रमज़ान रोजा(उपवास) संपन्न झाला.

सकाळ प्रहरी उठणे,पाच वाजता सहेरी म्हणजे उपवास बाळगणे, नमाज पठण करणे, कुराण पठण, रोजा, दानधर्म, इश्वराचा जपजाप आणि सायंकाळी पावणे सात वाजता इफ्तार म्हणजे उपवास सोडणे असा दिनक्रम रमज़ान महिण्यातील असतो. ह्या पुण्यकर्म बाबींना अगदी प्रत्येक मुस्लिम बांधवांसह लहान मुले देखील मनोभावे जीवापाड जपत असतात.

सदरील मुलीचे कौतुक करीत त्याला सद्भावरूपी शुभेच्छां देण्यात आल्या. शेख शब्बीर शहाहुसेन (वाहक रा.प.म. मुखेड), शेख कलीम, शेख बाबू, माजी बँकर फक्रूशा मदार, चांडोळा बँक सहाय्यक महमदरफी मदार, बिलोली महसूल सहाय्यक शहा अजिमोद्दीन, कवी, गीतकार जाफर आदमपूरकर, शहा मैनोद्दिन, शहा अहेमद, शहा उस्मान कासराळीकर,शेख फारूक, यासह मुस्लिम बांधव व पाहुण्यांनी इशरतचे कौतुक केले आहे.

# उमरीच्या मॉडर्नमध्ये स्कुलमध्ये महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १० मार्च-**

शहरातील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कृतत्वान महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उमरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. निलम कांबळे, डॉ. ज्योति चोपवाड यांनी, विधिज्ञ विजया गुंडाळले, सहशिक्षिका मनिषा सितावार, महिला पोलिस शांता शिंदे, सफाई कामगार सुनंदा खंदारे यांनी मार्गदर्शन व अनुभव कथन केले. ह्यावेळी उपस्थित महिलांसाठी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम करण्यात आला त्यात अनेक महिलांनी भाग घेतला. सोनाली देशपांडे यांनी संतकवी दासगणू महाराज यांनी रचलेला राणी लक्ष्मीबाई पोवाडा गाऊन दाखविला.

शाळेतील विद्यार्थीनींनी स्वत : रचलेल्या कवितांचे वाचन करून दाखविले.वर्षा जाधव यांनी सोशलमिडियाचे माध्यम व त्यात स्त्रियांचा सहभाग ह्यावर प्रकाश टाकला. विविध गुणदर्शन कार्यक्रमात ऐश्वर्या उत्तरवार, विद्या पबितवार, परदेशीताई, रसिका मुक्कावार, चंदनकर, निलिमा वर्मा, सोनाली देशपांडे आदींनी भाग घेतला. कार्यक्रमास कंदकुर्ते, सविता रणखांब, श्रुती मुक्कावार, मिराबाई चौदंते, ढगे, सानिका कुलकर्णी व शाळेतील सर्व महिला कर्मचारी व महिला भगिनींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इयत्ता आठवीतील विद्यार्थीनी गोजिरी गोजे हिने केले तर प्रास्ताविक व आभार शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा कुलकर्णी यांनी केले आहे.

# व्हाईस ऑफ इंडियाच्या दक्षिण नांदेड अध्यक्षपदी संभाजी सोनकांबळे तर सचिवपदी शिवाजी राजूरकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १० मार्च-**

व्हाईस ऑफ इंडिया पत्रकार संघटनेची नांदेड (दक्षिणची) कार्यकारिणी नुकतीच घोषित करण्यात आलीअसून,अध्यक्षपदी संभाजी सोनकांबळे यांची तर सचिवपदी शिवाजी राजूरकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. व्हाईस ऑफ इंडिया या पत्रकार संघटनेचे संस्थापक- अध्यक्ष संदीप काळे, जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी व राज्य सरचिटणीस श्रीनिवास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम सावंत यांचे अध्यक्षतेखाली १० मार्च रोजी सिडको, नांदेड येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत व्हाईस ऑफ इंडिया, या पत्रकार



संघटनेच्या नांदेड (दक्षिणच्या) अध्यक्षपदी पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची, तर सचिव तथा 'सल्लागार'पदी पत्रकार शिवाजी राजूरकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या बैठकीतच व्हाईस ऑफ इंडियाच्या नांदेड दक्षिण शाखेच्या उपाध्यक्षपदी सूर्यकुमार यन्नावार, कोषाध्यक्षपदी तुकाराम सावंत व कार्याध्यक्षपदी दिगंबर शिंदे यांची, तर सहसचिवपदी पत्रकार सुरेश आंबटवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचे नांदेड (दक्षिण) विधानसभा मतदार संघातील सामाजिक कार्यकर्ते तथा विविध राजकीय पक्ष, धार्मिक संघटना, शैक्षणिक संघटनेचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधींकडून स्वागत करण्यात येत आहे.

# होळीनिमित्त काव्यपौर्णिमा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने होळी व धुलीवंदन या सणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील मालेगाव रोड स्थित भावसार चौक नजीकच्या पवन नगर परिसरातील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या ९३ व्या काव्यपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता प्लास्टीक व कचऱ्याची होळी पेटवून होणार असून त्यानंतर परिसरातील कवी कवयित्रींच्या सहभागाने काव्य पौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमास प्रारंभ होणार असल्याची माहिती काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे आणि आयोजक पांडुरंग कोकुलवार यांनी दिली.

येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या मालेतील ही ९३ वी काव्यपौर्णिमा असून होळी निमित्ताने मंडळाच्या वतीने सहभागी होणाऱ्या सर्व कवी - कवयित्रींचा खारिक खोबऱ्याचा हार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात विविध पुरस्कारांनी सन्मानित गोंडरकार अशोक कुबडे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे सहसचिव मारोती कदम, युवा कवी सोनु दरेगांवकर, पत्रकार राम तरटे यांना मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात येणार आहे.

# असर्जन येथील बौद्ध स्माशानभूमीला संरक्षक भिंत बांधुन देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० मार्च-**

शहरातील असर्जन येथील बौध्द स्मशानभूमीवर गावातील काही स्वयंघोषित राजकीय कार्यकर्त्याकडून कब्जा करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न हाणून पाडत बौध्द स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटवावे तसेच या स्मशानभूमीला संरक्षक भिंत बांधून पिंजऱ्याची व्यवस्था करुन द्यावी, अशी मागणी असर्जन येथील बौध्द समाज बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

शहरातील असर्जन येथील दत्तात्रय मंदिर परिसराला लागून असलेल्या जागेत मागील ६० वर्षापासून येथील बौध्द समाजाच्या स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येतात. परंतु मागील काही दिवसापासून याच परिसरातील काही स्वयंघोषित राजकीय कार्यकर्ते समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला असून, यामुळे जातीयवाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रकार घडण्यापूर्वीच याच स्मशानभूमीला संरक्षक भिंत बांधावी तसेच पिंजऱ्याची व्यवस्था करुन द्यावी, अशी मागणी असर्जन येथील बौध्द समाज बांधवांनी जनता पँथरच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे. या निवेदनावर आकाश चव्हाण, रामजी रगडे, संजय रगडे, राजू रगडे, प्रविण पाटील, नेमीचंद भोकरे, धम्मा सरपाते, शिवाजी गोडबोले यांच्यासह जवळपास शंभर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतकरी फार्मर आयडी तयार करा : पुरी

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. १० मार्च-**



शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषी क्षेत्रात डिजिटल क्रांती घडविण्यासाठी सरकारने शेतकरी फार्मर आयडी योजना सुरू केली आहे. नोंदणी निःशुल्क आहे. शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत नोंदणी करावी, असे आवाहन तलाठी पुरी यांनी केले आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी तलाठी व मंडळ यांनी प्रत्येक गावांत नोंदणी शिबिराचे आयोजन केले आहे. महसूल, कृषी यांचे संयुक्त पथक गावनिहाय गठित केले आहे. आधारकार्ड, आधारलिंक असलेला मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा घेऊन शेतकऱ्यांनी सीएससी सेंटरच्या सहकार्याने नोंदणी पूर्ण करावी. विविध सरकारी अनुदान व आर्थिक मदत, पीकविमा योजना, पीककर्ज मंजुरी, खत, बियाणे व औषधांसाठी मिळणारे अनुदान असे विविध फायदे या शेतकरी फार्मर आयडी नोंदणीचे आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या शेतकरी फार्मर आयडी योजनेत नोंदणी करावी, असे आवाहन तलाठी पुरी व मंडळ अधिकारी चव्हाण यांनी केले आहे.

# बंजारा समाज आणि होळी

बंजारा समाजात होळीचा सण अगदी दिवाळीसारखाच साजरा होतो, लोकगीतं हे बंजारा समाजाच्या लोकसंस्कृतीचे खास आकर्षण आहे . खरं तर होळीच्या आधी येणाऱ्या दांडी पौर्णिमेपासून त्यांच्या होळीला सुरुवात होते. या गीतांना 'लेंगी गीत' असेही म्हटले जाते. बंजारा समाजाच्या होळीत 'पाल', 'गेर', 'फगवा', 'धुंड' अशा अनेक परंपरा जोपासल्या जातात.

भारतीय सनातन संस्कृती विविध सण उत्सवांनी नटलेली आसून समाजात एकोपा रहावा तसेच समाज संघटित, सुरक्षित व समरस रहावा यासाठी सण उत्सवांचे अनन्य साधारण महत्व आहे. 'होळी' हा सण पूर्ण भारतात विविध प्रकारे साजरी केला जातो. बंजारा समाजातील होळी सण तर फारच उल्लेखनीय असतो.

बंजारा समाजात दोन सण प्रामुख्याने साजरी केले जातात एक होळी आणि एक दिवाळी. बंजारा समाजाचा पारंपारिक आणि अति विशेष सण म्हणजे होळी आहे. बंजारा समाजाच्या आकर्षक संस्कृतीचे दर्शन होळी मधून दिसते. बंजारा समाजात दांडी पौर्णिमेपासून होळीला सुरवात होत असते म्हणजे एक महिना आधीपासून. या होळी उत्सवात अगदी लहानांपासून तर वृद्धांपर्यंत सर्वचजण सहभागी होतात. निसर्गाला अनुसरून होळी उत्सव साजरा केला जातो.

बंजारा समाजात नृत्याचे विविध प्रकार आहेत राधा नृत्य, लडी नृत्य, उपरेरो नृत्य, पीर नृत्य, लंगडी पाय नृत्य. सर्व नृत्य होळी साजरी करत असताना सादर केले जातात. बंजारा समाजाचा इतिहास हा मौखिक असल्यामुळे लोकगीतांच्या माध्यमातून इतिहास समजतो. लोकगीतांना बंजारा समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नृत्य आणि लोकगीतांशिवाय बंजारा समाजाची होळी होऊच शकत नाही. होळी उत्सव पारंपरिक नृत्य, लोकगीते हे बंजारा समाजाचे अविभाज्य घटक आहेत.

सामान्यतः अन्य ठिकाणी पौर्णिमेच्या दिवशी होलिका पेटवून होळी साजरी केली जाते. परंतु, बंजारा समाजात दुसऱ्या दिवशी म्हणजेच धुलीवंदनाच्या दिवशी



पहाटेच्या अंधारात होळी पेटवली जाते. परंपरेनुसार तांडासमोर पूर्व दिशेला होलिकेस पेटवल्यानंतर महिला व पुरुष निघून जातात, पण युवक युवती होलिकाजवळ गाणी गातात आणि नाचतात. होळी खेळणा-या युवकाला 'गेरीया' तर युवतीला 'गेरळी' असे म्हटले जाते. मौजमजेसाठी महिला मोठ्या, मोठ्या काठ्या घेवून पुरुषांवर प्रहार करतात. विशेषकरून वहिनी-दिरावर काठ्यांचा प्रहार करते. बंजारा समाजात केसुलाला(पळस) विशेष महत्त्व आहे. तांड्यावर केसुलाला पाण्यात टाकून ओला रंग केला जातो व तो मोठ्याप्रमाणात वापरला जातो. ज्यांच्या घरात होळीच्या आधी किंवा नंतर मुलगा जन्माला आला आहे त्याचा जन्मदिवस होळीच्या दिवशी साजरी केला जातो त्याला 'धुंड' असे म्हणतात. ज्यांच्या घरात लहान मूल जन्माला आलं आहे त्याचा शोध घेतल्या जातो व त्यांच्या अंगणात 'धुंड' केला जातो. धुंड करत असताना त्या तांड्यातील सर्वजण नंगारा,हलगी,डफडा वाद्य वाजवत लेंगी गातात व नृत्य करतात. 'धुंड' च्या ठिकाणी खीर एका हंड्यात टाकली जाती, तो हंडा एका खड्यात टाकल्या जातो, मग नंतर तो हंडा काढण्यासाठी पुरुष प्रयत्न करतात तेव्हा महिला त्यांच्यावर लाठीमार करतात, कितीही लाठीमार झाला तरी शेवटी त्या व्यक्तीला हंडा पळवून न्यायचा असतो.

बंजारा समाजाच्या होळी मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नसतो, तांड्यातील प्रत्येकजण होळी उत्सव साजरा करण्यासाठी घराबाहेर एकत्र येतात. होळी सण साजरी करतांना बंजारा समाजातील सर्वसमावेशकता, संघटीतपणा, एकात्मता, बंधुभाव सहजपणे दिसून येतात. हजारो वर्षापासून देश व समाज रक्षणासाठी बंजारा समाज विविध प्रांतात भटकंती करत राहिला, तरीही आपली सनातन संस्कृती या समाजाने कायम जपून ठेवली आहे.

**विशाल पवार, देगलूर**

## संक्षिप्त वृत्त...

### महाकुंभ तिर्थ दर्शन सोहळा अनुलोम अनुगामी लोकराज्य महाअभियान अंतर्गत कार्यक्रम



**जिंतूर,/प्रतिनिधी :** म१४४ वर्षातुन येणारा महाकुंभ सोहळा गेल्या दिड महिन्यापासून श्री क्षेत्र प्रयागराज येथे महाकुभ सोहळा अयोजीत करण्यात आलेला होता या पुण्य पावन महाकुंभातील जल कलसात घेऊन अनुगामी लोकराज्य महाअभियान अंतर्गत अनुलोम या सेवा संस्थाने महाराष्ट्रातील २५० गावातील हेमाडपंथी पुरातन महादेव मंदिरे,तिर्थ स्थळी हा महाकुभातील पवित्र जल कलशाची दि.२६ बुधवार रोजी त्या ठिकाणी तेथील नागरिक अनिल देशपांडे, एकनाथ राऊत, प्रकाश पवार,भारत पवार, नाथा अंभोरे,गणेश पवार,सोमनाथ गायकवाड, बालाजी जाधव,गणेश सासनिक या सर्व सपत्नीक दांपत्याच्या व आदी मान्यवरांच्या हस्ते या महाकुंभ तिर्थ कलशाचे अभिषेक व पुजा,अर्चना करुन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले . यावेळी अनुलोम चे अतुल गाडे,पवन पुरी,दिपक भाग्यवंत, पत्रकार एकनाथ आवचार, गणेश राऊत यांच्यासह आदी ची ऊपस्थीत होती.

### बालिका अत्याचार विरोधी मोर्चाने परभणी दणाणली
### हजारो महिलांसह नागरीक सहभागी : प्रशासनाद्वारे न्यायाची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरातील १० वर्षीय अल्पवयीन बालीकेवर २३ फेब्रुवारी रोजी नराधमाने केलेल्या बलात्कार प्रकरणाच्या निषेधार्थ सोमवारी (दि.१०) येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर संतप्त हजारो महिलांसह नागरीकांनी मोठा निषेध मोर्चा काढला.

येथील लहुजी नगरातून या मोर्चास प्रारंभ झाला. मोठा मारोती मंदिर, शाही मस्जिद, महात्मा ज्योतिबा फुले पुतळा तेथून त्र शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात हा मोर्चा दाखल झाला. मोर्चातील संतप्त हजारो महिलांसह नागरीकांनी काळे झेंडे फडकवले. तर कपाळास काळ्या पट्या लावल्या. काही मोर्चेकऱ्यांनी हातात फलके झळकावून पोलिस प्रशासनाचा धिक्कार . तसेच नराधमास फाशीची शिक्षा द्या, आरोपींची नार्को टेस्ट करा, बालिका अत्याचाराचा निषेध असो, फास्ट्रॅक कोर्टात खटला चालवा यासह विविध आशयांचे, निषेधांच्या या फलकांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. मोर्चातील संतप्त नागरीकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मोर्चेकऱ्यांचा प्रचंड रोष होता, तो या मार्गा दरम्यान घोषणांच्या माध्यमातून तीव्रतेने दिसून आला.

संतप्त मोर्चेकऱ्यांनी पुतळा परिसरातील आंदोलनस्थळ मैदानावर ठिय्या मांडला. या ठिकाणी विविध पक्ष, संघटना, संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी १३ फेब्रुवारी रोजी गरिब मुलीवर घडलेल्या अमानुष अत्याचाराच्या प्रकरणाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त . माध्यमांमधून या प्रकरणाबाबत सातत्याने संताप व्यक्त झाला . परंतु, प्रशासनाने लहुजी नगरातील या क्रुर घटने संदर्भात फारशा गांभीर्याने दखल घेतली नाही. यातील जे आरोपी आहेत, त्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली नाही. या आरोपींची नार्को टेस्ट केली पाहिजे, त्यांच्या विरोधात भक्कम पुराव्या आधारे जलदगतीच्या न्यायालयात खटला चालविला पाहिजे व या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी दिली. अन्य भागांबरोबर परभणीतसुध्दा अत्याचाराचे प्रकार वाढत असल्या बद्दल या मोर्चेकऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त . पिडीत परिवारास शासनाने दहा लाख रुपये देवून त्यांचे पुनर्वसन करावे, अशीही मागणी केली. , एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करीत या संवेदनशिल विषयाकडे आपण गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी विनंती केली.

### ६० टक्के ग्रामस्थ करतात मोबाईलद्वारे आर्थिक व्यवहार

**परभणी,/प्रतिनिधी :** डिजिटल लिटरसी सर्वेक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना युवक शिबिरा अंतर्गत विटा खु. येथे करण्यात आलेल्या युथ फॉंर माय भारत, युथ फॉंर डिजिटल लिटरसी सर्वेक्षणामध्ये ग्रामस्थांकडून मोबाईल वापराची माहिती घेण्यात आली. शिबिरातील विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन ग्रामस्थांना २० प्रश्न विचारले या प्रश्नामधून मोबाईलचा किती कसा व कशासाठी वापर होतो याची माहिती घेतली.

सोनपेठ येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या वतीने विटा बु. येथे दि २८ ते ६ मार्च दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले . या शिबिरा दरम्यान विविध उपक्रम राबवण्यात आले. गावची स्वच्छता यासह विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यातील प्रामुख्याने डिजिटल साक्षर मोहीम नाविन्यपूर्वक उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाला ग्रामस्थांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिरातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावामध्ये ९५ कुटुंबांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण . या सर्वे मध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांपैकी बहुधा माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. गावामध्ये अँड्रॉइड मोबाईलचा ८१ टक्के वापर होतो तर १९ टक्के साध्या मोबाईलचा वापर होतो. मोबाईलच्या विविध सुविधा पैकी युट्रूब चा सर्वाधिक वापर होतो. तसेच गेम खेळण्याचे प्रमाण शंभर टक्केवर दिसून आले. गावातील मोबाईल हाताळणाऱ्या ग्रामस्थांकडून ६० टक्के आर्थिक व्यवहार हा मोबाईल मधून केला . मोबाईलच्या अतिवापरामुळे दुष्परिणाम होतात हेही ग्रामस्थांकडून सांगण्यात आले. मोबाईल हॅक प्रकाराविषयी अनेक ग्रामस्थांना कमी माहिती असल्याचे दिसुन आले. मोबाईलचे व्यसन लागले आहे का? असे विचारण्यात आले असता १०० टक्के व्यसन लागल्याचे काही ग्रामस्थांनी माहिती दिली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# चार दिवशीय कृषि महोत्सवास उदंड प्रतिसाद

## स्टेडिअम मैदानावर संस्कृती, साहित्य व प्रर्दशन : चर्चासत्र व मेळाव्यांमधून हजारोंचा सहभाग





**परभणी ,/प्रतिनिधी:-** श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) च्या वतीने ७ ते १० मार्च दरम्यान परभणीतील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडिअम मैदानावर आयोजित केलेल्या मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव २०२५ अंतर्गत चर्चासत्र, मेळावे व विविध प्रदर्शनीसह शेकडो स्टॉल्सवर शेकडो मान्यवरांसह दररोज हजारो नागरीकांनी भेटी देवून उदंड असा प्रतिसाद दिला.

या महोत्सवात विभागीय कृषी प्रदर्शन व तज्ञांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले . विशेषतः नामांकित कंपन्यांचे खत, औषधे, आधूनिक यंत्र सामूग्री, सेंद्रीय व जैविक तंत्रज्ञान, शेती उपयोगी विविध अवजारे, केळी, कपाशी, टिशू कल्चर बि-बियाणे, पशू खाद्य, अपारंपारिक उर्जा, प्रक्रिया उद्योग, पॉली हाऊस, कृषि विमा, बँक, कृषि पर्यटन व कृषि संबंधित वैविध्यपूर्ण बाबींचा सहभाग लक्षवेधी ठरला.

मराठवाडा कृषी संस्कृती दर्शन, खाद्य संस्कृती, सण-उत्सव मांडणी, पूर्वीची समृध्द पर्यावरण पूरक गावे, त्यातील विज्ञान, पशूधन व गोवंश प्रदर्शन, त्यातून पशू आणि गोवंशातील प्रजातींसह गोठ्यांचे प्रात्यक्षिकांसह माहिती, पशूखाद्य, चार्यांचे विविध प्रकार, डेअर उत्पादन, आधूनिक तंत्रज्ञान, दुग्ध व्यवस्थापनाबाबत माहिती व प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. दूर्मिळ वन औषधी व रान भाज्यांचे प्रदर्शनही लक्षवेधी ठरले. त्यातून आयूर्वेदिक शेती, बाजारपेठ याची माहिती, दुर्मिळ वन औषधींची मांडणी, उपयोग, प्रबोधन केले गेले. तसेच मोफत आरोग्य व व्यसनमुक्ती शिबीरासह शेतकरी वधू-वर परिचय मेळाव्यासह उदंड असा प्रतिसाद मिळाला. शहरासह जिल्ह्यातून तसेच जिल्ह्याबाहेरचेही हजारो नागरीक कृषि व इतर क्षेत्रातील रोजगार या संदर्भात माहिती, प्रशिक्षणास आवर्जून उपस्थित .

प्रदर्शनीसाठी नागरीकांची मांदियाळी....

७ मार्च रोजी सकाळी ९ वाजता कृषि दिंडी सोहळ्याने या महोत्सवास सुरुवात झाली. सकाळी १० वाजता उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या आनंदात पार पडला. त्या पाठोपाठ १ वाजता विषमुक्त शेती सत्र, ३ वाजता पशू गोवंश सत्र आयोजित करण्यात आले . तर ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता युवा कृषि नवचैतन्य अभियान, १२ वाजता शेतकरी वधू-वर परिचय मेळावा, ९ मार्च रोजी सकाळी ९ वाजता पर्यावरण प्रकृती जनजागृती अभियान, १२ वाजता स्वयंरोजगार चर्चासत्र व महिला बचतगट मेळावा आयोजित करण्यात आला .

१० मार्च रोजी सकाळी ९ वाजता माहिती तंत्रज्ञान जनजागृती अभियान राबविण्यात आले. १२ वाजता सरपंच-ग्रामसेवक मांदियाळीचे आयोजन करण्यात आले . दुपारी ४ वाजता प.पु. गुरुमाऊली यांचे हितगुज तर सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती आयोजक संदिप देशमुख यांनी दिली.

## कानाच्या तपासणी शिबिरात १८३ रुग्णांची मोफत तपासणी- परभणी मेडिकल कॉलेज आणि आर.पी हॉस्पिटलचा उपक्रम

**नोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** आ.डॉ.राहुलटयांच्यासंकल्पनेतून परभणी मेडिकल कॉलेज व आर पी हॉस्पिटल येथे ( ) प्रमाणित जागतिक श्रवण दिन साजरा करण्यात आला. जगात व संपूर्ण देशात सुरू असलेल्या राष्ट्रीय कर्णबधीरता निवारण उपक्रमा अंतर्गत मोफत कानाची (ऑडिओमेट्रीक) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिरात १८३ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यामध्ये २५ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याची गरज असल्याचे तपासणी अंती आढळून आले.



यावेळी, परभणी जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यातून अनेक पालक आपल्या लहान बालकांना व कानाच्या समस्या असणारे बहुसंख्य रुग्ण हे आर. पी हॉस्पिटल येथे आले . शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी परभणी मेडिकल कॉलेज व आर.पी.हॉस्पिटल चे अधिष्ठाता डॉ.प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.अमीर तडवी, कान,नाक घसा तज्ञ डॉ.फैज, परभणी नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य आरती मॅडम, बालरोगतज्ञ डॉ.बाबासाहेब गायकवाड,डॉ.सलाम तांबोळी, डॉ.शहाजी बोडखे,डॉ. संतोष हारकळ,डॉ.भीमराव कनकुटे, अस्थिरोग तज्ञ डॉ.कैलास लीपने, डॉ.करण जाधव, डॉ.फैसुद्दीन,आरोग्य विभाग प्रमुख राहुल कांबळे आदींची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी काना बद्दल उद्भवणाऱ्या समस्या बदल मार्गदर्शन केले. गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. आणि येणाऱ्या काळात आरोग्याच्या दृष्टीकोनातून अशा पद्धतीचे विविध आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

तसेच या पुढे आर. पी हॉस्पिटल येथे नामवंत तज्ञांकडून उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे सांगितले. परभणी मेडिकल कॉलेज आणि परभणी नर्सिंग कॉलेजच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी रुग्ण आणि त्यांच्या पालकांना शिक्षित करण्यासाठी मॉडेल्स व चित्र तयार केलेले तक्ते बनवून सक्रियपणे जनजागृती करण्यात सहभाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक पथनाट्य सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. फैज यांनी केले. तर सूत्रसंचलन स्वप्नील बोर्डे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल गायकवाड, पंकज गंगवाल,शिवाजी जाधव, मनोज पवार आदींनी पुढाकार घेतला.

## आई सावित्रीमाई च्या शिक्षण क्रांतीमुळेच आमच्या आयुष्याचं सोनं झाले :- सुवर्णा आवचार



**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील फुले क्रांती स्व.सा.महीला बचत गट चारठाणा च्या वतीने जागतिक महिला दिन व ज्ञानज्योती सावित्रीमाई ज्योतीबाराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त अध्यक्ष सुवर्णा एकनाथ आवचार याच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.
यावेळी जमलेल्या महीलाची खण ,नाराळानी ओटी भरुन मान सन्मान व सत्कार करण्यात आला.

यावेळी सामजिक कार्यकत्या व गटाचे अध्यक्ष सुवर्णा एकनाथ आवचार म्हणाले की, आज माय की माऊली आई सावित्रीमाई फुले नसत्यास तर,या देशातील तमाम महिलांना निरक्षरतेच्या मरण यातना सहन करत जगावं लागलं असतं. सावित्रीमाईनी शेन, माती, दगडाचा मारा सहन . म्हणून आज आमच्या हातात लेखणी सम तलवारी . तरीही आज स्त्री भुणहत्या ते बलात्काराची प्रवास अद्याप ही सुरूच . म्हणून सावित्रीआईच्या लेकीनी संघटित होऊन लढा दिला पाहिजे. तेच खरे सावित्रीबाईना अभिवादन होईल. असेही ते म्हणाले.
या कार्यक्रमास पत्रकार एकनाथ आवचार, गटाचे सचिव जनाबाई राऊत, गंगाधर करसकर,गोकुळअप्पा क्षीरसागर,बालासाहेब रासवे,मिरा रासवे,रुखमीणबाई आवचार, मुक्ता रासवे,ऊर्मीला पांचाळ, रेणुका आवचार, सुनिता गजमल, छाया मारकड, मनिषा आवचार ,साक्षी आवचार,वैष्णवी घाटुळ, शिवानी कटारे,राणी वानखरे,नेहा राठोड ,मोहीनी आवचार, अंकिता रासवे,यांच्यासह सर्व समाज बांधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## विविध क्षेत्रात महिला आत्मविश्वासाने कार्य करत आहेत-सौ.नखाते- जागतिक महिला दिनी पाथरी येथे कर्तबगार महिलांचा सत्कार संपन्न

**मोहन धारासूरकर**

**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी वार्ताहर: सर्वच क्षेत्रात महिलांनी आपल्या कर्तबगारिने आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे, जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात अत्यंत आत्मविश्वास पूर्वक महिला कार्य करत आहेत असे प्रतिपादन सौ. भावनाताई नखाते यांनी केले. शनिवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी शांताबाई नखाते विद्यालय शिवाजीनगर पाथरी येथे परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने गाथा सन्मानाची या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी त्या अध्यक्षिय स्थानावरून बोलत होत्या. याप्रसंगी सौ ऐश्वर्या लाहोटी, परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी च्या उपाध्यक्षा मंगल सुरवसे, पाथरी महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षा रेणुका सावळे, सुनिता राखुंडे, आदी उपस्थित . जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परभणी जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांचा सत्कार करण्यात आला, यामध्ये प्रशासकीय अधिकारी - अंजली कुलकर्णी ,विस्तार अधिकारी सांख्यिकी पंचायत समिती पाथरी डॉक्टर-सौ सारिका कुलकर्णी ग्रामीण रुग्णालय पाथरी, वकील-सौ जयश्री भदर्गे मानवत,शिक्षिका-डॉ.विजया दाढेल, पाथरी साहित्यिक-सौ मायाताई वांगीकर, कवयत्री,माळीवाडा पाथरी महिला वाहन चालक-श्रीमती आशा शंकर फड एस.टी.चालक,गंगाखेड आगार ,गंगाखेड,अंगणवाडी ताई-सुंदरताई आत्माराम मगर ,निवळी. आशा सेविका-मीनाक्षी नामदेवराव धोतरे,उपकेंद्र कासापुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पाथरगव्हाण तालुका पाथरी.

होमगार्ड-अरुणा कदम, पोलीस स्टेशन पाथरी, स्वच्छता कर्मचारी- नम्रताताई दत्ताराव हातागळे,पाथरी,आदर्श माता- मीराताई तुकारामजी गिराम, बाभळगाव, कु.सुमन सुरवसे डाटा ऑपरेटर, निबंधक कार्यालय पाथरी या महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी ऐश्वर्या लाहोटी यांनी समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांनी अग्रभागी राहावे असे उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. डॉक्टर विजया दाढेल यांनी मनोगत व्यक्त करताना महिलांच्या प्रगतीमध्ये शिक्षणाचे महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे महिलांनी उच्चशिक्षित व्हावे असे मत मांडले. कवयत्री मायाताई वांगीकर यांनी स्त्रीवादी कवितेचे वाचन केले. महिला वाहनचालक आशा फड यांनी जीवनामध्ये आव्हाने स्वीकारण्याची महिलांनी तयारी ठेवावी या आशयाचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना घटे यांनी तर आभार प्रदर्शन कमल कांबळे यांनी केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्राचीन काळात भारतीय महिला श्रेष्ठ व बलवान होत्या- डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

## आदर्श महाविद्यालयात महिला सक्षमीकरणावर राष्ट्रीय परिषद संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

पुरातन काळात आपल्या देशात महिला सर्व श्रेष्ठ होत्या व बलवान होत्या असे विचार मांडत प्राचीन काळातील अनेक महिलांचे उदाहरणे देऊन सांगितले. पुढे बोलताना आता स्त्री पुरुष समानता हा चिंतनाचा विषय बनला आहे. महिला अत्याचाराची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. महिला सक्षमीकरण व परिवर्तन हे घराघरातुन व्हायला पाहिजे असे मनोगत प्रभारी कुलगुरू डॉ जोगेंद्रसिंह बिसेन यांनी व्यक्त केले.

येथील आदर्श महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पीएम उशा) पुरस्कृत समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिनांक ८ मार्च २०२५ रोज शनिवारला लैंगिक समानता,कौटुंबिक हिंसाचार आणि महिला सक्षमीकरण या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. सदरील परिषदेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव तर उद्घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथील प्र. कुलगुरू मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित होते. प्रमुख बीजभाषक म्हणून धर्मशास्त्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ जबलपूर (म.प्र.) येथील डॉ. दीपलक्ष्मी चिले यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो.डॉ. एस. पी. घायाळ, परिषदेचे संयोजक प्रो.डॉ.विद्या खंडारे, सह संयोजक डॉ.विलास पवार, एमसीव्हीसी समन्वयक डॉ संजय कयाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रो. डॉ. एस.पी.घायाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिलांना शिक्षण देणे, आर्थिक मदत करणे, राजकीय सहभाग करून घेणे, स्त्री पुरुष समानता पाळणे, निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे म्हणजे खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण करणे आहे.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य प्रो.डॉ.विलास आघाव यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला सबलीकरण या विषयावर चर्चा व्हावी हा उद्देश होता. या निमित्ताने सखोल चर्चा होवून खऱ्या अर्थाने महिला सबलीकरणाला चालना मिळेल असे मनोगत व्यक्त केले.

डॉ. दीपलक्ष्मी चिले यांनी आपल्या बीज भाषणातून जगात केवळ भारतातच स्त्रीयांची पुजा केली जाते. आपली प्रगती, संस्कृती व सभ्यता जोपासण्यासाठी महिलांचे योगदान अतुलनीय आहे. महिला सक्षमीकरण करण्यासाठी समाजात सांस्कृतिक मूल्य देणे महत्वाचे आहे यासाठी योग्य शासन, अनुशासन व प्रशासन याची गरज आहे. असे विचार मांडले.

परिषदेचे प्रास्ताविक संयोजक डॉ. विद्या खंडारे यांनी केले. स्वागत गीत संगीत विभाग प्रमुख धनंजय जोशी,डॉ.सुरेंद्र साहू,अरुण पापंटवार यांनी सादर केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन हाटकर तर आभार प्रदर्शन प्रा. सपना पुपुलवाड यांनी केले.

समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील सामाजिक शास्त्र संकुल चे संचालक प्रो.डॉ.घनश्याम येळणे उपस्थित होते. तसेच प्रो. डॉ.रामचंद्र भिसे, डॉ. निवृत्ती हुरगुळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रो.डॉ. घनश्याम येळणे यांनी महिला प्रगतीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकीत मार्गदर्शन केले. तसेच प्रो.डॉ.रामचंद्र भिसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रो.डॉ.विलास आघाव यांनी उपस्थित सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करून परिषदेच्या यशस्वी आयोजन आणि नियोजनासाठी आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रचना पारिख यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विलास पवार यांनी केले.

या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेला विविध महाविद्यालयातील व महाराष्ट्राबाहेरील महाविद्यालयातील एकुण १६० प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला होता. संयोजक प्रो.डॉ.विद्या खंडारे, डॉ. सचिन पत्की, प्रा. अमजदखान पठाण, डॉ. विलास पवार, डॉ. अण्णाजी मडावी, डॉ. आनंद भट्ट आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत मेळाव्यात २१ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**



तक्रार निवारण मेळाव्याच्या माध्यमातून उपविभाग हिंगोली ग्रामीण अंतर्गत येणारे पोस्टे चे एकूण २१ अर्ज प्रकरणे निकाली काढण्यात आली. यापुढे देखील अशाच पद्धतीने नियमितपणे तक्रार निवारण मिळाव्याचे आयोजन करून वरिष्ठ कार्यालया कडून चौकशी कामी प्राप्त होणारे अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हिंगोली ग्रामीण येथे तसेच उपविभाग अंतर्गत येणारे पोस्टेला प्राप्त होणार अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी अंबादास भुसारे यांनी सांगितले.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात उपविभागीय पोलिस अधिकारी अंबादास भुसारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हिंगोली ग्रामीण येथे तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हिंगोली ग्रामीण येथे तसेच उपविभागातील पोलीस ठाणे येथे प्राप्त तक्रारी अर्ज संबंधाने योग्य ती कारवाई करावी व सदरचे तक्रारदार यांचे तक्रार संबंधाने संबंधितांना योग्य तो न्याय मिळावा तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली निघावी या अनुषंगाने आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली शहर अतिरिक्त पदभार उपविभाग हिंगोली ग्रामीण अंबादास भुसारे, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सेनगाव नाईक, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण श्याम कुमार डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक वाचक मगन पवार यासह उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हिंगोली ग्रामीण येथील कर्मचारी वर्ग ज्यामध्ये राहुल गोटरे मोहन धाबे, गोविंद खांडेकर, आशा केंद्रे, अनुसया चव्हाण, वाघमरे, डवले, अर्जुन गजभार यासह उपविभागातील पोस्टे ज्यात हिंगोली ग्रामीण, सेनगाव, गोरेगाव व नरसी नामदेव येथील अंमलदार ज्यामध्ये अस्लम गारवे, ढेंबरे, नागरगोजे, जाधव बांगर, करे, नरोटे, सूर्यवंशी, भारती असे सदर अर्ज संबंधी काम पाहणारे व सदर अर्ज चौकशी करणारे अंमलदार हे देखील हजर होते यासह संबंधित अर्जदार तथा गैरअर्जदार हे देखील सदर ठिकाणी आले होते. सदर तक्रार निवारण मेळाव्यामध्ये आलेले अर्जदार व गैरअर्जदार यांनी पोलिसांचे या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केल्याची भावना सदर मेळाव्या नंतर दिसून येत होती.

# कळमनुरी येथे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**



कळमनुरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हा अध्यक्ष दिलीप चव्हाण उपस्थित होते,

या बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि नगरपरिषद होणाऱ्या निवडणुकीच्या आढावा घेण्यात आला व अनेक नवीन पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. यामध्ये कळमनुरी विधानसभा अध्यक्षपदी गणेशराव गडदे, जिल्हा उपध्यक्षपदि ॲड. रवी शिंदे, तालुकाधक्ष रामचंद्र क्षिरसागर, तालुका सरचिटणीस पदी राजू बाभळे, शहाराध्यक्ष शेख मोईन, तालुका विद्यार्थी अध्यक्षपदी रितेश देशमुख शहर विद्यार्थी अध्यक्ष शेख अरेफ, हिंगोली तालुकाध्यक्षपदी सर्जेराव कवडे, तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय सुरेश राव घोडगे, जिल्हा उपाध्यक्ष विध्यार्थी च्या पदी केशवराव करे, शहर उपाध्यक्ष पदी बाबा सिद्धीकी, युवक तालुका उपध्यक्ष सुदर्शन वयकोळे यांची दिलीप चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आल्या. या वेळी सोनू चव्हाण, भास्कर कुरे, अवधूत नीलकंठे, सुशील बोंढारे, बाबा भाई, डॉ. संतोष बोढारे, आनंदराव कदम, अभिजित देशमुख, गुलाबराव भोयर, खाजाभाई बागवान, अवेश नाईक, अन्वर पठाण, किशनराव वाघमारे, अंबादास बोरकर, राजेश नीलकंठे, श्रीकांत वाघमारे, रावजी बेले, विठ्ठल पवार आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- होळी आणि रंगपंचमी सण अवघ्या दोन दिवसांवर आला असल्यामुळे येथील बाजारपेठेत विविध प्रकारचे रंग तसेच साखर, गुळ तसेच खारीक, खोबऱ्याच्या गाठी विक्रीसाठी आल्या आहेत. गाठी व रंग खरेदीसाठी नागरिक बाजारात गर्दी करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पारधी समाजाचे औंढ्यात उपोषण



हिंगोली- औंढा नगानाथ तहसील कार्यालयासमोर पारधी समाजाच्यावतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू आहे. औंढा तालुक्यातील जवळा बाजार येथील पारधी समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. स्मशानभूमी गट क्रमांक १३१ व १३२ मध्ये असून १३३/१२९/१३४ मध्ये सुद्धा काही लोकांनी अतिक्रमण केले.समाजाची एकूण दोन एकर दोन गुंठे जमीन सात बारावर आहे. त्यापैकी आज रोजी सात बारावर फक्त सात गुंठे स्मशानभूमी ची जमीन शिल्लक आहे. त्याकरीता त्यांची जमीन दोन एकर दोन गुंठे त्यांना परत मिळण्याकरीता आदिवासी पारधी क्रांती संघटना यांच्या मार्फत औंढा तहसील गेटवर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले. आमरण उपोषणात जिल्हाध्यक्ष सुरज पवार, गणेश काळे, रेखा चव्हाण, मीना काळे, प्रयागबाई काळे हे आमरण उपोषणास बसले. जोपर्यंत आमची जमीन परत केल्या जात नाही तोपर्यंत बेमुदत यावेळी हनुमान काळे, पंडित पवार, कोंडाबाई काळे, पूजा चव्हाण, संजूबाई काळे, तुळसाबाई काळे, संजय काळे, शमा काळे, सावित्रीबाई पवार यांची आमरण उपोषणस्थळी उपस्थिती होती.

### मोंढ्यात ६०० क्विंटल हळदीची आवक



हिंगोली- येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमध्ये सोमवारी सुमारे ६०० क्विंटल हळदीची आवक झाली आहे. शेतकऱ्यांनी वाहनांद्वारे सकाळपासूनच कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळद विक्रीसाठी आणली होती. सध्या नवीन हळदीला प्रतिक्विंटल ११ हजार तर जुनी हळदीला प्रतिक्विंटल १२ हजार ५०० रूपये भाव मिळत आहे. हिंगोली बाजार समितीमध्ये हळदीला चांगला भाव मिळत असल्यामुळे हिंगोलीसह परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणात हळद विक्रीसाठी आणत असल्याचे चित्र दिसत आहे.

# लायन्स क्लब वसमत प्राईडतर्फे राम ऱ्हदय किटचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, १० मार्च**

येथील लायन्स क्लब वसमत प्राईड तर्फे राम हृदय किटचे वाटप लायन्स योगेशकुमार जैस्वाल यांचे हस्ते करण्यात आले.

रविवार दिनांक ०९ मार्च रोजी मोंढा येथे लायन्स क्लब वसमत प्राईड तर्फे निवडणुकीमध्ये योगेश कुमार जैस्वाल हे उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असल्यामुळे वसमत तेथील लायन्स क्लब लायन्स क्लबच्या भेटीला ते आले होते.

यावेळी लायन्स क्लब नांदेड मिडटाऊन तर्फे देण्यात आलेली राम हृदय किट चे वाटप वसमत येथे करण्यात आले. यावेळी लायन्स क्लब नांदेड प्राइड चे अध्यक्ष मोहन देशमुख,लायन्स मनीष मकन अध्यक्ष लायन्स क्लब नांदेड मिड टाउन तसेच लायन्स शिरीष गीते तसेच लायन्स क्लब वसमत प्राईड चे अध्यक्ष योगेश चेपूरवार, डॉ मारोतराव क्यातमवार, डॉ वैभव पडोळे, डॉ बाळासाहेब शेलुकर, सचिव राजू सिद्दिकी, कोषाध्यक्ष मन्मथ सिद्धेवार, सदस्य गौसबाई बागवान, बाळासाहेब बेले, कल्याण कुरुंदकर, संजीव कुमार बेंडके, विक्रम कुंटूरवार, आलोक जाधव, सतीश टाक, रोहित टेहरे, समीर कुरेशी, जुगल चेपूरवार, ॲड प्रदीप देशमुख, आदींची उपस्थिती होती.

# रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणामुळे छत्रपती शिवाजी चौकात वाहतुकीची कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**



येथील शासकीय विश्रामगृहाजवळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणे झाल्यामुळे या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे. सोमवारी तब्बल एक तास वाहतुकीची कोंडी झाल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवाजी नगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणे थाटण्यात आली आहेत तसेच शासकीय विश्रामगृह परिसरात अवैधपणे बॅनर्स, पोस्टर्स लावण्यात आले आहेत. तर शासकीय विश्रामगृहाकडून नगर पालिकेकडे जाणाऱ्या रस्त्यावरही अनेकांनी अतिक्रमणे केली आहेत. त्यामळे चौपदरी रस्ता असूनही पायी चालणाऱ्यासाठी तयार करण्यात आलेल्या फुटपाथवर अतिक्रमणे थाटल्यामुळे रस्ता अरूंद झाला आहे. याठिकाणी बँका, शाळा, महाविद्यालये तसेच शासकीय विश्रामगृहात येणाऱ्या व्हीआयपी लोकांच्या गाड्या तसेच अकोला रोडकडून येणारी अवजवड वाहने तसेच बसेस यामुळे हा रस्ता वर्दळीचा आहे. या चौकात वाहतुक पोलिस नसल्यामुळे या चौकात नेहमीच वाहतुकीची कोंडी पहायला मिळते. वाहन चालक नियमांचे उल्लंघन करीत वाहने चालवित असल्यामुळे तसेच वाहन कुठेही उभे करीत असल्यामुळे या रस्त्यावर अपघातांची शक्यता आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक हा वर्दळीचा भाग असल्यामुळे येथील वाहतुकीच्या कोंडीला कारणीभूत अतिक्रमणे काढून याठिकाणी वाहतुक पोलिसांची नियुक्ती करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# येहळेगाव सोळंके येथे पाणीपूरवठा सुरळीत करण्याची तहसीलदारांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्चे**

औंढा नागनाथ तालुक्यातील येहळेगाव सोळंके येथे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात तहसीलदार हरीश गाडे यांना युवकांनी निवेदन दिले आहे.

मौजे येहळेगाव सोळंके येथे दि २७/०२/२०२५ रोजी काही युवकांनी पाणी पुरवठा सुरळीत नसल्याने उंचीवरील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले असता उपविभागीय अभियंता. ग्रा.पा.पु. उपविभाग, कंत्राटदार यांचे लेखी आश्वासन व पोलीस निरीक्षक जी एस राहीरे व तहसिलदार हरीश गाडे यांच्या मध्यस्थीने अभियंता यांनी पुढील तीन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करून देण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले होते. परंतु अद्यापपर्यंत गावामध्ये पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही. तहसीलदार यांनी या प्रकरणी आपले स्तरावरून योग्य ती कार्यवाही करून गावाचा पाणी प्रश्न तात्काळ सोडवावा. अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.निवेदनावर शुभम सोळंके, सचिन सोळंके, शरद सोळंके कोंडबाराव पोपलाईत, बालाजी कऱ्हाळे, परमेश्वर वाघमारे, स्वप्निल सोळंके , आकाश वाघमारे, गणेश सोळंके, ओंकार सोळंके, गंगाधर सोळंके, प्रतीक सोळंके, बेगाजी क-हाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुल्यशिक्षण संवर्धन स्पर्धेत दराडे विद्यालयाचा हनुमान जाधव प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील इयत्ता आठवी चा विद्यार्थी हनुमान गजानन जाधव याने मूल्य शिक्षण संवर्धन परीक्षेत हिंगोली जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. परीक्षेचे आयोजन श्री. राधा गोपीनाथ मंदिर चौपाटी, मुंबई व इस्कॉन शाखा हिंगोली यांच्या मार्फत केले गेले होते. प्रथम क्रमांक पटकावला याबद्दल इस्कॉन तर्फे हनुमान जाधव चा स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र व सायकल देऊन गौरव करण्यात आला. तसेच शांताबाई दराडे विद्यालयाचा समर्थ विनायक चुकेवार इयत्ता आठवी वी व सृष्टी शिवदास लेकुळे इयत्ता सातवी वी या विद्यार्थ्यांना सुद्धा त्या वर्गातून प्रथम क्रमांक प्राप्त झालेले आहेत. या परिक्षेकरीता विद्यालयाचे उपक्रमशील अध्यापक प्रवीण राऊत यांनी समन्वयक व मार्गदर्शक म्हणून काम केले. सर्व यशस्वी विद्यार्थी, विद्यार्थीनी व मार्गदर्शक अध्यापक यांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक डॉ. प्रकाश स. अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसीदास चीलमुल यांनी सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे अभिनंदन केले.

# आई वडील सर्वश्रेष्ठ-योगानंद सरस्वती स्वामी

## ब्राह्मण समाज सभागृहाकरता निधी कमी पडू देणार नाही-आ.प्रकाश सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मार्च**

माजलगाव मध्ये सामुदायिक उपनयन संस्कार हा कार्यक्रम समस्त ब्राह्मण समाजाने आयोजित केला हा स्तुत्य उपक्रम असून या ब्राह्मण समाजाच्या सभागृहाकरिता निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले तर सर्व समाजांनी आई-वडिलांना देवासमान मानून त्यांची सेवा करावी हीच ईश्वर सेवा आहे असे मत आदिलाबाद मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद यांनी व्यक्त केले.

माजलगाव येथे आज दिनांक ९ मार्च रविवारी सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमाचे आयोजन समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आले होते . या कार्यक्रमास आमदार प्रकाश सोळंके , योगानंद सरस्वती स्वामी, माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, मोहन जगताप ,बाबुराव पोटभरे, डी.के.देशमुख, नारायण डक अँड. भानुदास डक नितीन नाईकनवरे , संभाजी शेजुळ ,जयदत्त नरवडे, अमरनाथ खुरपे, अरुण राऊत, तुकाराम येवले, सुरेंद्र रेदासनी, अँड.कालिदास थिगळे, गजानन जोशी, अँड.मकरंद पत्की, डॉ. श्रीराम खळगे कचरू खळगे, डॉ. मधुकर घुबडे शरद यादव ,विजय शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की माजलगाव येथील समस्त ब्राह्मण समाज सातत्याने विविध सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजन करतात. ब्राह्मण समाजाच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी मी विधानसभेमध्ये लक्षवेधी देखील मांडली होती आज त्याला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे, आगामी काळात देखील ब्राह्मण समाज करिता सभागृह उभारण्यासाठी निधीची कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी आशीर्वाचन पर मार्गदर्शन करताना आदीलाबाद येथील रामकृष्ण मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद सरस्वती स्वामी म्हणाले की ब्राह्मण समाजाने



दिशा देण्याचे काम आजपर्यंत केलेले आहे , असे असले तरी देखील गायत्री मंत्राची उपासनना करण्याची गरज आहे. सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमात एकोणवीस बटुंवर आज उपनयन संस्कार करण्यात आले हा निश्चितच स्तुत्य व कौतुकास्पद उपक्रम असल्याचे देखील स्वामी यांनी सांगितले. प्रास्ताविकात बोलताना उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉक्टर सचिन देशमुख म्हणाले की माजलगाव सारख्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण समाज संघटन करण्यात आलेले आहे सातत्याने सामुदायिक उपनयन संस्कार करून समाजाला दिलासा देण्याचे काम केले जाते हे करत असताना सर्व समाजाचे पाठबळ मिळत असल्यामुळेच हे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन हिमांशू देशमुख ,लता जोशी डॉ.प्रज्ञा जोशी, नंदकुमार कुलकर्णी, यांनी केले तर दत्ता महाजन यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉ,सचिन देशमुख, अनंत शास्त्री जोशी, राजू पाठक,विनायक रत्नपारखी, बप्पासाहेब देशमुख दामोदर संधी कर अशोक कान्नापूरकर, चंद्रकांत देशमुख, मुकुंद जोशी व समस्त ब्राह्मण समाज बांधवांनी पुढाकार घेतला.

# लिंगायत कोष्टी समाज संस्थेच्या वतीने वधू-वर पालक परिचय मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## वधू-वर परिचय मेळावे विवाह जुळवण्यासाठी उपयुक्त -डॉ.नंदकुमार वसवाडे






**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० मार्च**

समाजातील वधू-वरांच्या विवाह जुळवण्यासाठी ओळख व संवाद होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा मेळाव्यांमुळे पालकांना आपल्या मुलांसाठी योग्य जोडीदार निवडण्याची संधी मिळते. त्यामुळे वधू-वर परिचय मेळावे नियमितपणे आयोजित होणे आवश्यक आहे, असे मत महाराष्ट्र राज्य लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार वसवाडे यांनी व्यक्त केले.

संस्थेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त दिनांक ९ मार्च २०२५ रोजी स्वयंवर मंगल कार्यालय, माळीनगर, अंबाजोगाई येथे वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरातून शेकडो वधू-वर पालक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. वसवाडे म्हणाले, प्रत्येक पालकांची इच्छा असते की त्यांच्या मुलामुलींना चांगला जीवनसाथी मिळावा. अशा मेळाव्यांमुळे योग्य जोडीदार शोधण्यास मदत होते आणि विवाह जुळवणीसाठी बाहेर फिरण्याचा त्रास वाचतो. त्यामुळे असे मेळावे वारंवार होणे आवश्यक आहे.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक संजय डहाके, तर अध्यक्ष म्हणून डॉ. नंदकुमार वसवाडे हे उपस्थित होते. तसेच बारामती येथील फौजदार बजरंग कोरवले, पुणे येथील फौजदार श्रीमती श्वेता नरखेडकर, महाराष्ट्र राज्य महिला लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनंदा अष्टगी, तसेच सचिन हळदे, परमेश्वर जावळकोटी, शंकर बेले, महादेव निराळे, सचिन ढोपरे, चिंतामण पारीशवाड, अनिल तुळसनकर, श्रीमती शीतल वांढरे, प्रशांत वैंदकर, किरण कोष्टी, दीपक काटे, श्रीशैल मालापुरे, सतिश बिडवे आदी मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

शेकडो विवाह इच्छुकांना लाभ-या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील विवाह इच्छुक वधू-वर आणि त्यांच्या पालकांना योग्य जोडीदार निवडण्यासाठी सुवर्णसंधी मिळाली. राज्यभरातून आलेल्या समाजबांधवांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंबाजोगाई येथील लिंगायत हटगर कोष्टी समाजाच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. समाजातील विवाहसंस्थेला बळकटी देणारा आणि समाजातील कुटुंबांना जोडणारा हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद ठरला.

नितीन जुजगर व डॉ.अशोक शिनगारे यांचा विशेष सत्कार

समाजाच्या सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय योगदान देणारे माजलगाव येथील श्री. नितीन जुजगर आणि एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत समाजातील गरजू विद्यार्थ्यांना मदत करणारे डॉ. अशोक शिनगारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



मौजे अंजनडोह ता.धारूर येथील जलजीवन मिशन योजनेचे काम वारंवार तक्रार देऊनही पूर्ण होत नसल्यामुळे आज सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर गावकऱ्यांनी भव्य मोर्चा काढला. छाया-कृष्णा शिंदे

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे जागतिक महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मार्च**

दि.८ मार्च २०२५ रोजी रविशंकर विद्यामंदिर येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. .या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,सचिव शेख पाशा सर ,प्रमुख पाहुण्या म्हणून महिलांसाठी विविध कार्यक्रम राबवणार्या तसेच तेजस्वीनी संस्था चालवत असलेल्या सोनल पाटील मॅडम यांची उपस्थिती होती तसेच कार्यक्रमासाठी स्नेहा पारगावकर मॅडम, उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम ,शिक्षक वर्ग आणि पालक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी स्वरांजली सोनवणे हिने महिला दिनानिमित्त उत्कृष्ट भाषण सादर केले. तसेच इयत्ता चौथी व पाचवीतील विद्यार्थिनी महिला दिनाच्या अनुषंगाने महिलांसाठी एक छान नृत्य सादर केले .यानंतर इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी आरोही जोशी नी उत्कृष्ट भारूड सादर केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व महिला पालकांसाठी सामान्य ज्ञानावर आधारित परीक्षा ठेवण्यात आली होती.

## आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्रासह परराज्यातील कृषी संशोधन केद्र, ऐतिहासिक स्थळांना दिल्या भेटी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मार्च**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत व आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालय बीड येथील बी. एस्सी. कृषी पदवीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा राज्यस्तरीय शैक्षणिक सहलीचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कृषी संशोधन केंद्र, संशोधन संस्था याबरोबरच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली. या ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सदरील सहलीचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा यांच्या नियोजनाखाली पाचव्या अधिष्ठाता समन्वय समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना शक्तीला पुरेशी संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने या शैक्षणिक सहलीचे आयोजन २४ फेब्रुवारी १ मार्च २०२५ दरम्यान करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या शैक्षणिक सहलीच्या प्रथम चरणामध्ये राज्यातील कृषी संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, राष्ट्रीय स्तरावरील नामांकित कृषी व कृषी संलग्नित क्षेत्रामध्ये कार्यरत कंपन्या ना भेट देऊन माहिती घेतली. तसेच ऐतिहासिक महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला, विविध सागरी किनारे, कृषी महाविद्यालये ई. ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संपादित केली. सदरील शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून सहलीत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींना कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योग व्यवसाय, हंगामानुसार पीक उत्पादन, उपलब्ध बाजारपेठा इत्यादी विविध कृषि क्षेत्रातील तांत्रिक मार्गदर्शन व माहिती प्राप्त करून घेतली. या सहलीच्या नियोजन व आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा, डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्रा.बालाजी बहिरवाल, डॉ. पी डी खेडकर, प्रा. व्ही बी शिंदे, प्रा. के एस पवार, प्रा. माया शिंदे, प्रा. गव्हाणे, प्रा. पवार, राऊत, अशोक पवार यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा , प्रा. बालाजी बहिरवाल व सर्व प्राध्यापक यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

गोव्यातील राष्ट्रीय सागर संशोधन संस्था, पणजीला भेट

शैक्षणिक सहलीच्या द्वितीय चरणामध्ये विद्यार्थ्यांनी गोव्यातील राष्ट्रीय सागर संशोधन संस्था, पणजी, विविध सागरी किनारे, मंगेश टेम्पल, विविध चर्च, क्रूज इत्यादी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व मनोरंजन ठिकाणी भेटी देवून तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली.

विद्यार्थ्यांनी पाण्यातील वेगवेगळ्या राइट्स चा घेतला आनंद

शैक्षणिक सहलीच्या शेवटच्या टप्प्यात महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण च्या निसर्गरम्य ठिकाणी भेट देऊन तज्ञ प्रशिक्षकामार्फत विद्यार्थ्यांनी पाण्यातील वेगवेगळ्या राइट्स त्यामध्ये बनाना राईड, बंपर राईड चा आनंद घेऊन बोटिंग मधून मालवण च्या निसर्गाने नटलेल्या खाडीतून हाऊस बोट, पाण्यातील विठ्ठल मंदिर, देवबाग बीच, तूसुनामी आयलँड, गोल्डन रॉक, लाईट हाऊस इत्यादी विविध ठिकाणाचा १४ किलोमीटरचा प्रवास बोटीतून करून सर्व मालवणचा आनंद घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रसिद्ध असा पाण्याणी वेढलेला सिंधुदुर्ग किल्ल्याला विद्यार्थ्यांनी बोटीद्वारे भेट देऊन सिंधुदुर्ग किल्ल्याची पूर्ण माहिती संकलन करून गडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे दर्शन घेऊन गडावर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज याच्या पायाच्या ठशाचे दर्शन घेऊन किल्ल्याची विद्यार्थ्यांनी पाहणी केली. आणि सदरील किल्ल्याचे महत्त्व जाणून घेतले.

## जिल्ह्याच्या राजकारणात महिलांनी ठसा उमटवला-डॉ.दिपाताई क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मार्च**

आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे. बीड जिल्ह्यात स्व.केशरबाई काकू क्षीरसागर, स्व.विमलताई मुंदडा, खा.रजनी पाटील, मा.आ.उषाताई दराडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मा.खा.प्रीतमताई मुंडे यांनी राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली. महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद झालेली असून कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे, असे प्रतिपादन बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

परळी येथील जवाहर शिक्षण संस्था संचलित वैद्यनाथ महाविद्यालय, नवगण शिक्षण संस्था संचलित नवगण महाविद्यालय, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, इनरव्हिल लेडीज क्लब, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य पोलीस महिला ई-तक्रार या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे शनिवारी आयोजन जागतिक महिला दिनानिमित्त वैद्यनाथ कॉलेजमध्ये घेण्यात आले होते. याप्रसंगी बीड येथील नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.

व्यासपीठावर अध्यक्ष लक्ष्मीबाई देशमुख ह्या होत्या. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.विद्या देशपांडे, डॉ.दिपा क्षीरसागर, प्राचार्य डॉ.ए.आर. चव्हाण, प्राचार्य डॉ.मधुकर आघाव, श्रद्धा हालगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ.वीरश्री



आर्या यांनी केले. पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी पूर्वीच्या काळात अनिष्ट रूढी परंपरा असल्या कारणास्तव स्त्रियांची परिस्थिती अत्यंत बिकट होती, परंतु सद्यस्थितीच्या काळात स्त्रियांना विविध प्रकारचे अधिकार प्राप्त झालेल्या होणे त्यांच्यात परिवर्तने घडून आली आहे. स्त्रियांनी चूल आणि मूल एवढाच कार्य न करता त्यांनी स्वकर्तबगारीने कार्य करावे. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच कायदा व शिक्षणाचा अधिकार स्त्रियांना प्राप्त झालेला आहे, असे सांगून आजच्या युगात स्त्रिया विविध क्षेत्रात अग्रेसर आहेत, असे त्या म्हणाल्या. प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे यांनी शिक्षण क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. त्याबरोबर मुलींनी स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे असे मत याप्रसंगी व्यक्त केले. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, जागर - गोंधळ, सेल्फी पॉइंट, लेक माझी सावली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषक देखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमात नवगण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर आघाव यांनी प्राचीन काळात व सद्यपरिस्थितीच्या काळात स्त्रियांची स्थिती कशा पद्धतीची आहे, याविषयीचे विवेचन केले. आभार प्राचार्य डॉ. ए.आर.चव्हाण यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.मीना म्हेत्रे व प्राध्यापक रजनी शेटे यांनी केले. या कार्यक्रमाला तिन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक महिला व विद्यार्थिनी व परळी शहरातील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.